
# जीवन ह्याला नाव!



प्राचार्य- डॉ. दि. ग. नाईक

# जीवन ह्याला नाव

लेखक

प्रा. डॉ. **दिनानाथ गजानन नाईक**

---

संपादक

**गुं. फ. आजगांवकर**

प्रकाशक :

**गुं. फ. आजगांवकर**
१७ के. जी. बी. निवास
गिरगाव मुंबई ४०० ००४

प्रसिद्धी : ऑगस्ट १९८५

**किमत १० रुपये**

मुद्रक :

**सौ. माधुरी म्हात्रे**
नरेश मुद्रणालय, अलिबाग
जि. रायगड

# प्रास्ताविक

माझे मित्र प्राचार्य डॉ. दि. ग. नाईक हे कोकणच्या थोर सुपुत्रांपैकी एक असून त्यांनी मराठी साहित्यांत चांगली भर घातलेली आहे. आत्मचरित्राची कला आय. एन्. ए. चीफ् सेनापती भोसले, नॅशनल डिसिप्लीन स्कीम स्क्रॅप्ड्, राइज् अँड डिक्लाईन ऑफ दशावतार ही त्याची इंग्रजी पुस्तके असून श्रीमद् दत्तगिरी महाराज, अनंत शिवाजी देसाई, माझी वाटचाल हे त्यांचे मराठी चरित्रात्मक ग्रंथ अत्यंत रसाळ व वाचनीय असे झाले आहेत. प्राचार्य अजूनही कोकणच्या लाल मातीत रमतात. त्यांचे सामाजिक कार्यही तसे महत्त्वपूर्ण आहे. खानोली गांवच्या उत्कर्षासाठी त्यांनी व त्यांच्या कुटुंबातील इतरांनी केलेली समाजसेवा आदर्शमेव आहे. प्राचार्य नाईक सेवानिवृत्त होऊन बरीच वर्षे लोटली. आता ते सत्तरी पूर्ण करीत आहेत. ह्या सत्तरीच्या वाटचालीच्या निमित्ताने 'जीवन ह्याला नाव !' हे त्यांनी लिहिलेले शब्दचित्रांचे पुस्तक आता प्रकाशित होत आहे. गजालीन घोव व्हाल्लो हे एक छोटे प्रहसन आणि त्यांच्या पुस्तकांवरील काही अभिप्राय यात संग्रहीत केले आहेत.



प्रो. दिनानाथ गजानन नाईक यांचा जन्म कुडाळ प्रांतांतील खानोली गावी सन १९१५ मध्ये झाला. त्यांचे प्रा. शिक्षण खानोली येथे त्यांच्या गावी झाले. १९३० मध्ये ते पुणे येथे नूतन मराठी विद्यालयात दाखल झाले. १९३५ मध्ये मॅट्रिक झाल्यांवर १९३९ पर्यंत चार वर्षे नोकरीनिमित्त ते अनेक ठिकाणी भटकत होते. महाराष्ट्र शुगर फॅक्टरीत १५ रु. पगारावर त्यांनी काटामास्तर म्हणूनही नोकरी केली होती. १९३९ मध्ये मुंबई नगरपालिकेत वॉर्ड इन्स्पेक्टर म्हणून नोकरी मिळाल्यावर त्यांनी आपले नांव विलसनमध्ये दाखल केले. इंटरला त्यांना मेरिट्स् स्कॉलरशिप मिळाली आणि १९४५ मध्ये ते बी. ए. (ऑनर्स) झाले. ४५ ते ४७ पर्यंत ते विलसनमध्ये फेलो होते. १९४७ मध्ये एम्. ए. झाले आणि लगेच रुईयामध्ये इंग्लिशचे लेक्चरर म्हणून काम करू लागले. या वेळी त्यांनी म्युनिसिपल नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर नदियाड येथे त्यांची प्रोफेसर म्हणून नियुक्ति झाली होती. तेथे त्यांनी दोन वर्षे काम केले. १९५९ मध्ये ते पी.एच्. डी. झाले. खालसा कॉलेजात ते इंग्रजीचे प्राध्यापक होते. खानोली ग्रामोत्कर्ष समाज मुंबई ह्या संस्थेचे ते एक प्रमुख आधारस्तंभ असून त्यांच्या कळकळीच्या कार्याची त्यांच्या गावात विशेष ख्याति आहे.

आज आपण ज्याला दक्षिण रत्नागिरी जिल्हा म्हणतो तो भाग आणि गोव्यातील बारदेशपर्यंतचा प्रदेश प्राचीन काळी कुडाळदेश किंवा पंचमहाल कुडाळ या नावाने ओळखला जाई. 'कुडाळ' हे ह्या प्रदेशाचे मध्यवर्ति ठिकाण, राजधानीचे शहर आणि व्यापारी केंद्र होते. जुन्या कागदपत्रातून कुडाळी माप आणि कुडाळी धारा हे शब्दप्रयोग आढळतात. ह्या भागांतील देवस्थान व्यवस्थाहि वेगळी आहे. सत्याश्रय पुलकेशीचा ज्येष्ठ पुत्र चंद्रादित्य हा चालुक्यराजा ७ व्या शतकांत कुडाळ येथे राज्य करीत होता. त्यानंतर ११ व्या शतकात प्रसिद्ध कुडाळ-देशकर 'गोमप्रभु १३ व्या शतकात राजा देम आणि सूर्यभान व चंद्रभान प्रभू देसाई यांनी कुडुवलपत्तन कुडाळ येथे राज्य केले. यावेळी दाभोळ बंदर ही उत्तरेस सरहद्द होती. १७ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत पंचमहाल कुडाळचे देशमुख वालावल येथील प्रभुदेसाई हे होते. माणगांवतर्फेचा नाईक खेमसावंत याने हा भाग आपल्या ताब्यात घेऊन सावंतवाडी हे राजधानीचे ठिकाण केले. दक्षिण कोकणचा हा भाग प्राचीनकाळीं अतिशय समृद्ध होता, हे तेथील प्राचीन अवशेषांवरून सहज दिसून येते. ह्या भागातील बोली भाषेला 'कुडाळी बोली' असे नाव असून हल्ली काहीजण स्वतःच्या गांवच्या अभिमानामुळे मालवणी, सावंतवाडची किंवा वेंगुर्ल्याची बोली म्हणून संबोधतात. आज सामान्यतः देवगडच्या नदीपासून तो गोव्यांतील कोलवाळच्या नदीपर्यंत कुडाळी बोलीचा प्रदेश आहे. गोव्यातील बोलीला 'गोयची' किंवा कोकनी–कोकणी असे नाव असून ती कुडाळीहून बरीच भिन्न आहे. कुडाळी बोलीचे संशोधन अजून कोणी केलेले नाही. परंतु कै. रा. ब. वासुदेवराव बावडेकर, कै. गणेश मुकुंद परुळेकर, ज्ञानकोशकार केतकर, आ. रा. देसाई यांनी त्यावर लेखन केले आहे. कुडाळीबद्दल गव्हर्नमेंट रेकॉर्डमध्ये पुढील उल्लेख आहे.– The original language used throughout the State by Hindus excepting the higher classes, is impure Marathi and was termed Kudalee from its being peculiar to the district of that name and to the southern talooka of the Ratnagiri Collectorate.' [Bom. Govt. Records, No. X] महाराष्ट्रराज्य अस्तित्वात आल्यामुळे मराठी भाषेला आता विशेष दर्जा मिळालेला असून मध्यवर्ती मराठी भाषेच्या विकासास ज्या प्रधान बोलीभाषांनी हातभार लावला त्या बोलींना विसरून चालणार नाही. मराठीच्या जन्मपूर्वी कुडाळी बोली अस्तित्वात होती आणि कोकणपट्टीत ती मान्यता पावलेली होती.

प्राचार्य नाईक यांनी कोकण मराठी डायलेक्ट्स् या नांवाची संस्था सुमारे पंचवीस वर्षे चालवून त्या द्वारे आपल्या मातृभाषेची सेवा केली आहे. प्रस्तुतच्या पुस्तकामुळे कोकणच्या अभिजात लेखकांतील त्यांचे श्रेष्ठ स्थान स्पष्ट होईल.

**–गुं. फ. आजगांवकर**

# रगोआपा

'रेऽऽऽ गजाऽऽ रेऽऽऽ गजाऽऽ' घोगऱ्या आवाजात आपल्या नावाने आलेल्या हाका ऐकून माझे वडील नाना (गजानन आत्माराम नाईक) मला म्हणाले,' नाथा, तो रगो आपा कित्याक आराडताहा बघ रे जरा.'

नानांचे शब्द कानी पडताच आमचे शेजारी रगोआपा यांच्या आवाजाच्या रोखाने मी धूम ठोकली. आखूड पंचा नेसलेले उघडेबंब रगोआपा भर दुपारी वयीच्या आपल्या बाजूला लागून केळीच्या फाळयाने झाकलेला कानतुटका कप हातात घेऊन उभे होते. मला पहाताच ते म्हणाले, 'रेऽऽऽ खोंर्वस धर.'

लहानपणी मला खर्वसाचे फार कौतुक वाटे. आमच्या घरी गुरे–ढोरे खूप होती. अनेकवेळा गाई–म्हशीचे वीत होत असे, एखादी गाय अगर म्हैस व्याल्यावर केव्हा एकदा खरवस तयार होतो असे मला होई. खर्वस तयार झाला म्हणजे नाना प्रथम तो देवापुढे ठेवीत व मगच आम्हाला त्याचा प्रसाद मिळत असे. खर्वसाचा बराचसा भाग नाना इष्टमित्रांना आवर्जून पाठवीत असत. रग्याआपांना गुराढोरांची फार हौस होती. पण त्यांच्या गोठयाला यश नव्हते. कधीकाळी एखादी गाय व्याली तर ती सरळ दूध म्हणून देत नसे. दूध काढताना लाथ मारण्याची सवय तिला जडे, तर कधी दूधका होऊन तिचे वासरूच मरून जाई. मग दूध कमी होता होता महिन्याभरात ती भाकड होऊन जाई. अशा या विपरीतपणामुळेच आपल्या गोठयात कधी काळी गाईचे वीत झालेच तर ती गोष्ट आपा लोकांपासून गुप्त ठेवीत. आमच्या त्यांच्या आत्यंतिक घरोब्यामुळेच आपल्या गाईच्या विताचे गुपित फोडणारा खर्वस त्यांनी आम्हाला आवर्जून दिला होता.

आमच्या घरासारखेच रग्याआपाचे लहानसे नळयांचे मांगरी घर होते. घराच्या चारीबाजूंना आपानी झापाच्या पडव्या काढल्या होत्या.

त्यापैकी एका उघडया पडवीत त्यांचा गोठा होता. घराच्या दर्शनी बाजूला खळ्यात तुळशीवृंदावन होते.तुळशीच्या कुंडीत नेहमी एक वाढलेला उस असे. तुळशीच्या लग्नानिमित्त तो वाढलेला उस तोडला की, त्याचा एकच एक अंकूर वाढून पुढील वर्षी तुळशीच्या लग्नाला तयार ऊस मिळतअसे.असा हा क्रम आपांच्या हयातीपर्यंत अखंड चालू राहिला. आपांच्या घरी डोक्यावरच्या पदराची एक वृद्ध बाई होती तिला आम्ही रग्याआपांची आई म्हणत असू. तथापि, ,ती त्यांची स्वत:ची आई नसून त्यांच्या पत्नीची आई म्हणजेच त्यांची सासू होती, ही गोष्ट आम्हाला बरेच वर्षांनंतर समजली. आपांच्या पत्नीला आम्ही रग्याआपाची मावशी म्हणत असू. तर आई, आपा आणि मावशी अशी इनमिन तीनच माणसे त्या घरात नांदत होती. ती तीनही माणसे अख्खा दिवस आपापल्या उद्योगात चूर असत. आपापाशी असणाऱ्या थोडयाशा जमिनीत समुद्रकिनाऱ्यालगत धुळीतली माड–बागायत व डोंगराच्या उतरणीवरील आडवण होते आपाचे आडवण म्हणजे करवंदीच्या काटेरी जाळयांनी दगड–धोंडयांनी आणि सर्पांच्या मोठमोठाल्या रोहिणींनी व्यापलेले खरोखरीचेच एक आडरान होते. त्या आडरानाच्या वाटेला जायला सहसा कोणीही धजत नसे. पण आपा आणि मावशीने तन–मन–धन खर्चून, रक्ताचे पाणी करून त्या भयानक आडवनाचा कायापालट केला होता. करवंदी तोडून त्यांनी काटे साफ केले. रोहिणी खोदून काढून सर्पकुलांना आडवणाच्या भूमीतून निर्वासित केले. ठिकठिकाणी ताली बांधून कुणगे तयार केले, कुणग्यांच्या मेरेमेरेने काजू, आंबा, फणस, रतांबा अशा उपयुक्त झाडांची लागवड केली. कुणग्यात कधी नाचणा, कधी हरीक तर कधी ताग आपा लावू लागले. अशारीतीने हा हा म्हणता त्या आडरानाचे डोळयाना सुखविणाऱ्या एका सुंदर उपवनात रूपांतर झाले.

धुळीतल्या माडांना उन्हाळयाचे आठ महिने भरपूर पाण्याचा रतीब दिला नाही तर त्यांच्या कवाळयावर बोंडे दिसणे तर सोडाच पण त्यांचे चुडीतही हिरवे रहात नसे. रगोआपा आमच्या नानांपेक्षा आठदहा वर्षांनी वडील होते. ते मध्यम उंचीचे आणि अंगापिडाने मज-

बूत होते. लाठीला गळ घेऊन बावीचे पाणी काढून ते हरणीत सोडीत. खोरे–करले घेऊन मावशी माडांना यथास्थित पाणी लावी. त्यामुळे आप्पांच्या माडांची आळी सदैव ओली व हिरव्या चारीने भरलेली असत. बोंडयानी भरलेले माडांचे हिरवेगार कवाळे डोळयांचे पारणे फेडीत असत. सुकलेले चुडीत आप्पांच्या माडावर शोधूनही सापडत नसे. आपा आणि मावशीचा अवघा दिवस घराबाहेर वावरण्यात जाई.त्यामुळे घर चालवण्याचे काम आईवर पडले होते. आई वयाने वाकलेली होती. तथापि, ती चिवट हाडाची अनुभवी बाई होती. आपांच्या पैशाअडक्याचे सर्व व्यवहारही तीच ठेवीत असे. आई जशी व्यवहारदक्ष तशीच सुगरणही होती. घरात गोड–धोड करून आप्पांना ती संतुष्ट ठेवीत असे. आपाही आईच्याच तंत्राने वागत असत. नारळ, वाडवणी, सुंभ वगैरे वस्तू विकून आलेल्या पैशाचा हिशोब ते आईला देत बंदा रुपया झाला की आई तो भिंतीतल्या बुडकुल्यात जमा करून ठेवी. बुडकुल्यात एकदा पडलेला रुपया परत बाहेर काढण्याचा प्रसंग सहसा येत नसे

आपा खरेखुरे भूमीपुत्र होते. आंग मोडून काम करून निढळाचा घाम गाळून त्यांनी आपली अल्पशी भूमी नमुनेदार सजविली होती. त्यांच्या भूमीसेवेत मावशीने त्यांना चांगलीच साथ दिली. मावशी शिडशिडीत बांध्याची पण फार काटक बाई होती. घरातल्या चुलीत कधी तिने आग केली नव्हती, मग रांधप कशाशी खातात हे तिला माहीत कसे असणार ? सुदैवाने आईने सरदारकीने चूल सांभाळली आणि मावशीची झाकलेली मूठ सव्वालाखाची राहिली. शेती बागा-यतीची कामे मात्र मावशी आपांच्या बरोबरीने एखाद्या मानालायाही लाजवील अशा तडफेने करीत असे. पण सदैव काबाड-कष्ट करून तिचे शरीर अगदी चोफड झाले होते. स्त्रीसुलभ लोभसपणाचा लवलेशही तिच्यात नव्हता. भरीस भर म्हणून की काय तिची कूसही फळली नव्हती. तथापि, या उणिवाबद्दलचा विषादही तिच्या वर्तनात फारसा कधी आढळला नाही.आपण स्त्री आहोत ही जाणीव तिला होती किंवा नाही देव जाणे.

आपांना मात्र आपल्याला संतान नसल्याचीं फारच खंत वाटत असावी.

अनेक वर्षे पुत्रप्राप्तीसाठी त्या उभयतांचे उपासतापास आणि व्रतवैकल्ये चालू होती. आमचे आजोबा भाऊ (आत्माराम दाजी नाईक) यांनी आमच्या घरावरच्या डोंगरात एक औदुंबर बांधला होता. आमचे नाना घरातल्या देवांची नित्य पूजा करीत. पण पूजेसाठी औदुंबरावर गेल्याचे मी त्यांना कधीही पाहिले नव्हते. डोंगरात औदुंबराच्या आसपास भुते वावरतात असा माझा समज होता. तरीही वेळीअवेळी औदुंबराच्या आसपास भिरभिरत रहाण्याची खोड मला जडली होती. असाच एक दिवस भिरभिरत असता औदुंबराच्या खाचीत जास्वंदीचे एक लालधमक फूल मला दिसले आणि भुताच्या भीतीने माझे काळीज चरकून गेले. कोणीतरी खुळचात काढील म्हणून फुलाची ही गोष्ट मी कोणाकडे बोललो नाही. पण त्यानंतर एक-दोन दिवसांनी भर दुपारी बोटीच्या भोंग्यासारखा आवाज ओदुंबराकडून येताना मी ऐकला. लालधमक फुलाने माझ्या मनात भीतीचा खड्डा केलाच होता; त्यात आणखीन या आवाजाची भर पडली आणि भुताच्या भीतीने माझी गाळण उडाली. 'औदुंबरावर भूत आसा' 'औदुंबरावर भूत आसा' असे ओरडत मी नानांकडे धावलो व त्यांना घडलेली गोष्ट सांगितली.

नाना म्हणाले, 'अरेऽऽ त्या रग्याआपान औदुंबराची पूजा करून शंख वाजवली. त्येचो तो आवाज. भूतबीत काय नाय थयसर. लाल जास्वंतीची फुला तो पूजेक घालता.' नानांच्या खुलाशाने लाल फूल व दुपारचा आवाज याबद्दल माझा भ्रमनिरास होऊन मला अगदी हलकेहलके वाटले. नाना पुढे म्हणाले, 'भाऊच्या औदुंबरावर रग्या वेतुरकराची श्रद्धा आसा. औदुंबराक प्रदक्षिणा घालून पूजा केली तर आपणाक झिल जायत असा तेका वाटता. आज कितीतरी दसों औदुंबराक गंध फूल घातल्याशिवाय तो दुपारचो जेवणा नाय.' थोडा वेळ थांबून नाना पुढे म्हणाले, 'पण रग्याआपाक झिल नाय ह्याच बरा आसा. झिल जालो तर खातलो काय? घरात ही इन बीन तीन बोडा. दिससभर मर–मर मरतहत, पण त्येंच्या धुळकट जमिनीत कितीय मेला तरी गावता काय? त्येंच्याकडे पावणो–पै नाय्, आव–जाव नाय् तरीपण त्येंका जिभेक काटो खौन रवाचा लागता.' रग्या

आपाचे संपूर्ण नाव 'रघुनाथ नारायण वेतूरकर' असे होते. आम्ही नायीक, आमच्या आजूबाजूचे सर्व वतनदार येसू नायीक,मामा नायीक, शिवराम नायीक, म्हादेव नायीक, नारायण नायीक, गोपाळ नायीक असे सर्व नायीकच होते. मग हा रघ्या वेतूरकर आमच्या शेजारला कसा काय उपटला ह्याचे कुतुहल मला चैन पडू देईना. मग केव्हातरी एकदा नानानीच मला ती कथा सांगितली.

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी आम्हा नायीकांचा कूळपुरुष सरदार गोम (गोविंद प्रभू खानोलकर सावंतवाडी संस्थानच्या एका तर्फेचा नायीक होता. त्याची ती नायकी त्या काळात फारच गाजली. त्यामुळे लोक त्याला सरदार 'गोम नायीक' म्हणूनच संबोधू लागले. समुद्रकिनारा लाभलेली खानोलची मोठी वाडी गोम नायकाचे वतन होते. त्या वाडीच्या मधोमध वहाणाऱ्या व्हाळाच्या मळचात वायंगण (उन्हाळी भात) पिकत असे. त्यावरुनच या वाडीला वायंगणी वाडी असे म्हणू लागले. वायंगणीत सरदार गोम नायकाने आपला भव्यवाडा बांधला होता. खानोलीच्या श्री सिद्धेश्वर खळनाथादि ग्रामपंचायतन देव-स्थानचे व्यवस्थापनही गोम नायकाकडेच होते. गोम नायकाला तीन पुत्र झाले. त्यापैकी मधला निपुत्रिक झाला अर्थात् ज्येष्ठ व कनिष्ठ पुत्र वतनदारीचे समान भागीदार झाले. ज्येष्ठ पुत्राचे यथाकाल एकाचे पाच, पाचाचे पंचवीस व पंचविसाचे एकशे पंचवीस झाले. तथापि, अगदी कालपर्यंत कनिष्ठ पुत्राच्या वंशात एकएकटाच वारस राहिला. त्यामुळे अर्धी वायंगणीवाडी एका नायकाच्या मालकीची व राहिलेल्या अर्ध्या वायंगणीचे शतशः तुकडे अशी, अवस्था झाली. सुमारे सव्वाशे वर्षापूर्वी वडील वंशाचा देवबा नायीक वतनाच्या एका तुकड्याचा मालक होता, तर कनिष्ठ वंशातील त्याचा समकालीन सोहीरोबा (मामा) नायीक अर्ध्या वायंगणीचा मालक होता. देवबा नायकाला गोविंद (दादा) व तातोबा असे दोन पुत्र होते, तर सोहीरोबा मामा निपुत्रिक होते.

देवबाने निपुत्रिक सोयरोबाला तातोबास दत्तक दिला व अशा-प्रकारे मामाच्या वंशास आधार मिळाला. तातोबास यथाकाल संततीही

झाली. त्यात रामचंद्र (दादा) हा एकच मुलगा असल्यामुळे वतन अबाधित राहिले. रामचंद्र दादालाही एकच मुलगा लाभला. त्याला पणजोबाचे सोहीरोबा (मामा) हे नाव ठेवले. आमच्या नानांच्या समकालीन असणाऱ्या ह्या सोयरोबांनी आपले सोहीरोबा हे नाव बदलून ' सूर्याजी ' केले. सूर्याजी रामचंद्र तथा मामा नायीक ह्याच नावाने ते खानोलीच्या पंचक्रोशीत प्रसिद्ध पावले. सरदार गोम नायकाच्या वाड्याचे दोन भाग झाले होते, त्यापैकी ज्येष्ठ पुत्राच्या वाट्याचा भाग आता नामशेष झाला आहे. पण दुसऱ्या अर्ध्या भागात कनिष्ठ पुत्राचे वंशज प्रत्येक पिढीत एक, याप्रमाणे नांदले. थेट सूर्याजीमामांपर्यंत ही एकाची परंपरा चालू राहिली. सूर्याजीमामांना मात्र सहा मुलगे लाभले. या वंशात एकाचे अनेक होण्याची ही घटना गेल्या पावणेदोनशे वर्षांमध्ये प्रथमच घडली. मामांचे सहाही पुत्र मात्र चांगले कर्तबगार निघाले. कूळपुरुष सरदार गोम नायकाच्या प्राचीन अर्ध्या वास्तूला त्यांनी अद्ययावत स्वरूप दिले आहे. वायंगणीत ' मामा नायकाचे घर ' म्हणून ही वास्तू आता ओळखली जाते.

मामा नाईक खानोली गावाचे पुढारी होते. सार्वजनिक कामात ते नेहमी अग्रेसर असत. पण ते आयुष्यवान झाले नाहीत ! त्यांच्या मृत्यूच्या वेळी त्यांचा सर्वात धाकटा मुलगा श्रीपाद केवळ चार वर्षांचा होता. मामांचा कुटुंब परिवार फार मोठा होता. त्यातच गांवपुढारीपणामुळें त्यांच्या घरी अथिती अभ्यागत पै पाहुणे यांची मारखी वर्दळ असे. सुदैवाने मामांचा सर्वात मोठा मुलगा दत्तात्रय (दादा) जाणता होता. मामांच्या अवाढव्य कुटुंब रक्षकाची व इतर व्याप सांभाळण्याची कठीण जबाबदारी दादांवर अचानक येऊन पडली. दादानींही ती जबाबदारी कल्पनातीत कौशल्याने पेलली आणि आपल्या लहान भावंडाना वडिलांची उणीव कधीच भासू दिली नाही.

मामांच्या सार्वजनिक लाभाचा वारसा दादांनी पुरेपूर उचलून समर्थपणे पेलला. खानोलीगांवाची पंचायत सुरु झाल्या वेळेपासून तब्बल पंधरा वर्षे दादा खानोलीचे सरपंच राहिले. आपल्या कारकीर्दीत खानोली गावांत रस्ते, सांकव, शाळा, आरोग्यकेंद्रे इत्यादी अनेक सार्वजनिक हिताच्या गोष्टी त्यानी करवून घेतल्या. त्यांना वेंगुर्ले तालुका

पंचायतीचे सभापती बनण्याचाही बहुमान लाभला होता. सत्तरीच्या घरात असताना दादा क्रियाशील सार्वजनिक कामांतून निवृत्त झाले. तथापी त्यानी आपली क्रियाशक्ती डांबून न ठेवता दुसऱ्याच एका लोकोत्तर धर्मकार्यात खर्ची घातली. सन १९७५ च्या अक्षयतृतीयेला वायंगणीच्या कापावर रेडी ते रेवस सागरी महामार्गावर त्यानी श्री गणेश मंदिराची स्थापना केली. आजमितीस सर्व सरंजामानी सुसज्ज असे हे श्री गणेश मंदिर हजारो भाविकांचे श्रध्दास्थान बनले आहे.

दादांनी जीवनाच्या संधिकालांत केलेल्या या धर्मकार्यात त्याना त्यांच्या सर्व भावंडांचे व सरदार गोम नाईकांच्या इतर विद्यमान वंशजांचे सक्रिय सहाय्य लाभले ही अतीव समाधानाची गोष्ट होय. श्री गणेशाच्या स्थापनेनंतर हळुहळु वायंगणीच्या विदर्भ कापाचा काया-पालट होऊ लागला. आज मितीस श्री गणेश मंदिरासमोरच 'पूर्णानंद मानवसेवा प्रतिष्ठान'चे अद्ययावत् सोयीने सुसज्ज असे श्री लक्ष्मीनारायण हॉस्पिटल उभे राहिले आहे. तेथेच स. का. पाटील आरोग्य नगरीही आकाराला येत आहे. दादा आज ऐंशीच्या घरात आहेत. आपल्या प्रबळ इच्छाशक्तीची किमया डोळयानी पाहात आहेत. दिवसातून दोन वेळा ते आपल्या घरापासून मंदिरापर्यंत पायी जातात आणि येतात. ते कृतार्थ आहेत.

देवबा नायकाच्या तातोबाची कथा सांगता-सांगता वडील मुलगा गोविंद दादाची कथा तशीच राहिली. देवबाच्या पश्चात दादांनी सरदारकीने वागून आपल्या घराला स्वरूप आणले. झाडापेडाची लागवड केली. यथाकाळ त्यांना संततीही झाली. पण त्यात वंशाचा दिवा त्यांना गवसला नाही. दादांना दोन मुलीच झाल्या. दत्तक घेऊन वंश पुढे चालविण्याचा विचार त्यांनी सोडून दिला आणि वतन दोघी मुलींना सारखे वाटून दिले. परूळयाला दिलेल्या त्यांच्या मुलीने तिच्या वाटयाचे वतन वायंगणीच्या नायकानाच विकून टाकले. दुसरी मुलगी वेतुऱ्यास दिली होती. तिला एकच मुलगा होता. तोच रघुनाथ नारायण तथा रग्याआपा वेतुरकर होय. आमच्या वयीला लागून असलेले दादा नायकाचे वतन त्याच्या आईच्या, म्हणजेच त्याच्या वाटयाला आलेले होते. त्या वतनाची वहिवाट करण्यासाठी तो आमच्या शेजारी येऊन

स्थायिक झाला. गोविंद देवबा तथा दादा नायकांच्या पश्चात त्यांच्या वडिलोपार्जित घराचे घरटाण झाले. पण समुद्रकिनारी आमच्या शेजारी त्यांचा नातू रग्याआपा याचे नवीन घर उभे राहिले.

रग्या आपाच्या घराचा परिसर म्हणजे एक नमुनेदार उपवनच होते. त्यात कल्पवृक्ष (माड) उभे होते. त्याशिवाय तेथे आंबा, फणस, कवठ, पपनस, मोसंबी, लिंबू अशी कितीतरी झाडे होती. सफेद मिरची भोपळी मिरची, लवंगी मिरची, अनेक जातीचे घेवडे, तोंडलीची वेल, मिरवेल, पानवेल, केळही तेथे होती. जाई-जुई, शेवंती, मोगरी, अनंत, कण्हेर, पारिजातक तगर अशा फुलझाडांचीही गर्दी होती. बारमाही फुलणाऱ्या लाल, किरमीजी, सफेद व भगव्या जास्वंती आपांनी वयीच्या कडेला गच्च लाविलेल्या होत्या. त्यांच्या वयीपलीकडे जाऊन त्या रम्य उपवनात चक्कर मारावी असे मला अनेक वेळा वाटे. पण आपांची वयी अशी दाट आणि मजबूत की त्यातून चिटपाखरूही पलीकडे जाऊ नये. तरीही एकदा त्या वयीच्या पल्याड जाण्याचा योग मला आला. आमच्या देवक्या म्हशीने आपांची घट्ट वयी पेचून त्यांच्या आवारात प्रवेश केला. माझे लक्ष तिकडे गेले. देवक्याने वयीला पाड-लेल्या भोसक्यातून मी अलगद पलिकडे गेलो आणि पहातो तो देवकी जवळच्याच माडाच्या आळ्यानजीक चरत होती. माडांच्या आळ्यात आपांचे तवशा-चिबडाचे वेल असायचे हे मला माहीत असल्यामुळे माझ्या छातीत धस्स झाले. मी धावती करून आळे गाठले, तो खरो-खरच त्या आळ्यात तवशाचा एक वेल मला दिसला जवळजवळ सातआठ फूट वाढलेल्या त्या वेलाला मोठमोठाली पण सातच पाने आलेली होती. आणि प्रत्येक देठाला भलेमोठे एकेक तवसे लागलेले होते. देवकीच्या नजरेत ते रसरशीत खाद्य आले असते तर मोठीच पंचाईत झाली असती. सुदैवाने देवकीचा त्या वेलाकडे काणाडोळा झाला. आजूबाजूच्या लुसलुशीत चारीचे आडव्या जिभेने लचके तोडण्यात ती अगदी गुंग होती. रग्याआपाने माडाच्या आळ्यात केलेल्या त्या तवशी कौतुकाचे मनातल्या मनात कौतुक करीत मी देवकीला हाकून त्यांच्या परसातून लगबगीने परत आणले.

रग्याआपांचे डोके अनेक विषयात चालत असे. गणपतीच्या हंगामात आमच्या वायंगणीवाडीत एकदोन तरी गणपतीच्या शाळा (कारखाने) सुरू होत असत. आपा तसे काही खास कारागीर नव्हते. पण त्यांच्या हौसेला मोल नव्हते. घराच्या एका पडवीत त्यांची स्वतंत्र गणपतीची शाळा सुरू होई. इतर सर्व व्याप सांभाळूनही आपा ह्या गणपतीशाळेचा हंगामी व्याप दरवर्षी आवर्जून लावून घेत असत. गणपतीची माती मळणे, मूर्ती बनविणे, मूर्तींना रंग काढणे वगैरे अथपासून इतीपर्यन्त सर्व कामे आपा स्वतःच्या हाताने करीत असत. आपल्या घरच्या गणपतीमूर्तीबरोबरच आणखी दहापाच लोकांच्या मूर्ती बनविण्याचे काम ते मोठ्या हौसेने करीत असत. अर्थातच आमची गणपतीची मूर्तीही आपाच बनवीत असत हे सांगणे नलगे, इतर शाळेत प्रतिवर्षाला चांगल्या आकाराच्या नवीन कारागिरीच्या छान छान मूर्ती बनत असत. पण आपांच्या मूर्तींचा वर्षानुवर्षे एकच ठोकळेबाज घाट होता. मूर्तीच्या रंगातही आपांनी कधी नावीन्यपूर्ण बदल केला नाही. परिणामी इतरांच्या ठसकेबाज मूर्तींच्या मानाने आपांच्या हातची आमची मूर्ती अगदीच तोकडी पडत असे. एकदा मी नानांना म्हटले, ' आमचो गणपती रग्याआपाकडसून काढून घेवन दुसऱ्या चांगल्या शाळेत करूक देवा, ' पण नानांनी माझे म्हणणे मनावर घेतले नाही. परीणामी रग्याआपांनी आपल्या हयातीपर्यन्त प्रतिवर्षी आमचा गणपती बनविण्याची कामगिरी बिनचूक बजावली.

आपांच्या धुळीतल्या माडांना केवळ भरपूर पाणी दिल्याने भागत नसे. त्यांना वर्षातून एकदातरी मासळीचे खत घालावे लागे. आमच्या वायंगणीची वेळ म्हणजे चार मैल लांबीचा शुभ्र वाळूचा पट्टा होता. किनारा भरपूर लांब आणि चित्ताकर्षक असला तरी, बरेच वर्षांपर्यंत तो मासेमारीसाठी राबविला गेला नव्हता. आमच्या आजोबांनी (भाऊंनी) चार ठिकाणाहून चार रापणकार आणून आमच्या घराजवळच वेळेवर त्यांची घरकुले बांधून दिली. सुरुवातीला मोठमोठ्याने अखंड गरजणारा आणि अवखळ असा आमचा वायंगणीचा दर्या रापायला रापणकार भिऊ लागले. पण पुढे हळूहळू त्यांची भीती चेपली.

त्यांच्या संख्येतही वाढ झाली. भाऊंच्या हयातीपर्यंतच पाच रापण मंडळ्या (कंपन्या) त्या किनाऱ्यावर वावरू लागल्या. प्रतिवर्षी नारळी-पौर्णिमेला रापण होड्यांचे 'देवपाण' होई. नंतर शेंदूराने आणि फुलांच्या हारांनी सजवलेल्या, रापण भरलेल्या होड्या समुद्रात ढकलल्या जात. या पहिल्या रापणीत गावलेली सर्व मासळी रापणकार भक्तीभावाने अवघ्या गावाला प्रसाद म्हणून वाटून टाकीत. मृगनक्षत्र लागून दर्याला काडाकाड सुरू होईपर्यंत रापणी चालू रहात. रापणीच्या आठ महि-न्याच्या मोसमात पापलेट (पिठी), सरंगा, इसवण, सनाकी, रावस, करली, सोनम, घोळ, दाडा, शेंगाळा, बळा, गडदम, मोरी, शिवड, सुंगट, बांगडा, खरबा-बांगडा, पेडवा, तारली, विणंग असे विविध प्रकारचे बारीक मोठे मासे अमाप मरत असत. माशांची मरतूक मोठी असली तरी दळणवळणाच्या अभावी त्यांना बाहेर उठाव नव्हता. स्थानिक रहिवाशी मासे खाऊन खाऊन किती खाणार ? मग किनाऱ्या-वर जागा मिळेल तेथे मासे सुकत टाकण्यात येत. त्या उघड्या माशांवर कावळे, कुत्रे, कोल्हे यथेच्छ ताव मारीत असत. तरीही जागेच्या अभावी खंडोगणती माल तसाच पडून राही. मग रापणकार आपणहून रग्याआपाच्या माडांची आळी विसकीत आणि प्रत्येक आळ्यात दोन दोन मण ओली मासळी घालीत. माडांना मासळीचे खत पचविण्यासाठी नेहमीच्या मानाने दुप्पट पाणी लागे. मग आपांची फारच धांदल होई. लाठीला गळ घेऊन घेऊन त्यांच्या कमरेचा काटा ढिला पडे. लाठीच्या कामाने दांडगे दांडगे गडी टेकीला येत असत. मग पन्नाशी उलटून गेलेल्या आपांना दम लागू लागला तर नवल काय ? पण लाठीशिवाय बावीतून पाणी वर कसे काढणार ? आपांच्या तल्लख डोक्यात एक नामी कल्पना आली. त्यांनी बावीवर बैलाचा रहाट घालण्याचे ठरविले.

मी बैलाचा रहाट पाहिला नव्हता. आता रग्याआपाच्या बावीवर तो बसलेला कधी एकदा पहातो असे मला होऊन गेले. दररोज शाळेला जाताना आणि येताना रहाट दिसतो की काय म्हणून आपाच्या बावीवर मी मोठ्या आशेने नजर टाकीत असे. पण माझी सारखी निराशाच होत होती. एक दिवस वैतागाने मी नानांना म्हटले, 'रग्याआपाचो

ऱ्हाट कधी बसतलो ?' त्यावर नानांनी जे उत्तर दिले त्याने मी अगदी चाटच पडलो. नाना म्हणाले, 'अरेऽऽ रगोआपा सोताच सुतारकाम करून ऱ्हाट करताहा. तो कदी पुरो जातलो देवाक् ठावक.' आपांच्या भितोडीला खुपसे चिरलेले लाकडी दांडे, फळचा, ठोकळे, पट्टचा, खिळे, स्क्रू इत्यादी साहित्य जमवून ठेवलेले मी पाहिले. मग काही दिवसांनी रहाटाला लागणारे मातीचे मोगें आले. इतरही काहीबाही सामान येऊन पडतच होते. वेंगुर्ल्याला जाऊन आपा एखाद्या चालू रहाटाचे सुतारकाम पाहून घेत. त्या कामातील बारकावे आपल्यापरीने शिकून घेत. तेवढचा ज्ञानावर दुपारच्यावेळी हातोडी फरशी घेऊन त्यांच्या रहाट बांधणीची 'ठाक-ठूक' सुरू होई. महिन्यावर महिने लोटले तरी आपा त्या रहाटबांधणीशी झगडतच होते. त्यांच्या कामात काही प्रगती होत असलीच तर तो अगदी मुंगीच्या चालीने होत असावी. त्यातून कधी-काळी रहाट उभा राहील असे मला वाटेना. आणि यथाकाल मी आपांच्या बैल रहाटाला पूर्णपणे विसरूनही गेलो. असे असतानाच तो दिवस उगवला.

मी सायंकाळी शाळेतून घरी परतत होतो. रग्याआपाच्या बावी-पासून थोडचा अंतरावर आलो तो लोकांचा फार मोठा गलका मला ऐकू आला. बरेच लोक बावीच्या रोखाने अद्यापही धाव घेत होते. मीही बावीकडे धावलो आणि पहातो तो काय ज्याची आशा मी सोडून दिली होती तो रहाट तेथे प्रत्यक्ष बसविलेला होता. असंख्य लोक ते कौतुक• पहात होते. 'राट सुरु झालो', 'राट सुरू झालो', असे आरडत मी आनंदाने बेहोष झालो. तसाच धावत घरी पोहोचलो आणि नानांना ती बातमी दिली. पण नानांना अथपासून इतीपर्यंत त्या रहाटाची कथा पूर्वीच माहीत होती. नाना म्हणाले, 'रग्याआपाची तपश्चर्या दांडगी. त्येका फळ इला.' बैलाच्या रहाटामुळे रग्याआपाच्या माडांना आता पाणीच-पाणी झाले होते. आता वेळीअवेळी लाठीला गळ घेण्याची गरज उरली नव्हती. रहाटाचे पाणी साठवून ठेवण्यासाठी आपांनी हौद बांधायचे ठरविले. त्यांनी जांभ्या दगडाचे चिरे काढून आणले. वेंगुर्ल्याहून सिमेंट आणले आणि स्वतःच गवंडीकाम करून हौद तयार केला. दोन

वर्षे लागली तरी रहाटाचे सुतारकाम स्वत: करणारे आपा हौदाचे गवंडीकाम दुसऱ्याकडे देतील हे शक्यच नव्हते. अनेक कलांचे जुजबी ज्ञान असणारे आपा नेहमी स्वयंसिद्ध, स्वत:च्याच पायावर उभे रहात. आपल्या डोक्यावर आणि हातावर त्यांचा जबरदस्त विश्वास होता. रग्याआपा म्हणजे खरोखरच एक चालताबोलता उत्साह होता. त्यांच्या पुढाकाराने वायंगणीत उत्साहाचा वारा जोराने खेळू लागला. आपाबद्दल लोकांच्या अपेक्षा दिवसेंदिवस वाढू लागल्या.

काही काळ असा तसाच गेला आणि रग्याआपा शिक असल्याची बातमी आली आपांची पन्नाशी उलटली होती खरी तरीपण दगडासारखी त्यांची प्रकृती पाहून आणखी पंचवीस-तीस वर्षे तरी त्यांना धास्ती नाही असे वाटे. सदैव स्वत:च्या पायावर ताठ उभे असलेले आपा कधी आडवे पडतील हे खरे वाटत नसे. पण आपा खरोखरीच आडवे पडून गंभीर आजारी झाले होते. आपांच्या अडीअडचणीला रात्रीअपरात्रीसुध्दा धावून जाणारे आमचे नाना नेमके ह्याचवेळी कज्ज्यानिमित्त रत्नागिरीस गेल्याने अनुपस्थित होते. आपांना हगवणीचे दुखणे झाले होते. धावती करून त्यावर योग्य उपचार करविणारे नाना जवळ नसल्यामुळे आपांचा अगदी धीरच सुटला. थातूरमातूर गावठी उपायांनी आपांच्या दुखण्याला किंचितही उतार पडेना. उलट दुखणे वाढीस लागले. घरातल्या कर्त्या पुरुषाची ही अवस्था पाहून आई आणि मावशीचे धाबे दणाणले. त्यांच्या डोळ्यासमोर भेसूर दृश्य दिसू लागले. हगवणीच्या दुखण्याचे पाचसहा दिवस अनंत यातना सोसल्यावर रग्याआपांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली. चालत्याबोलत्या रग्याआपांचा बघताबघता हा असा देहांत झाला. एक लोभस स्वप्न अर्ध्यावरच भंगून गेले.

रग्याआपांनी हयातभर खपून निर्माण केलेली स्वप्ननगरीही त्यांच्या मागोमाग झपाट्याने लोप पावली. रहाट गेला, हौद गेला, हरणी मोडल्या. घराच्या पडव्या पडल्या- दारासमोरील तुळसीसकट आत वाढणारा ऊस दिसेनासा झाला. वयी मोडून लोकांनी चुलीला लावल्या. होत्याचे नव्हते झाले. एखाद्या लहान मुलाने वाळूत किल्ला

बांधून तो आपणहून मोडण्याचा खेळ करावा, त्याच चालीवर नियतीने वायंगणीच्या वाळूत रग्याआपाच्या हाताने सृष्टी घडविली आणि रग्याआपाला अकाली कालवश करून घडलेली ती सृष्टी लगोलग मोडूनही टाकली ! फिटंफाट झाली. बाकी शून्य राहिली !

●

## ' मास्तर '

१९५३ च्या सप्टेंबर महिन्यातील रविवारचा दिवस. मुंबईतील कुडाळदेशकर गौड ब्राम्हण ज्ञातिसभागृहात दादासाहेब परुळेकरांच्या अध्यक्षतेखाली एक शोकसभा भरली होती. गोविंदराव तथा आना वेतयेकर (पाटकर), विख्यात उद्योगपती अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांच्या उद्योगसमूहाचा कारभार मोठ्या सरदारकीने सांभाळीत होते. तथापि ' चक्रनेमिक्रमेण ' या न्यायाने आनांच्या कारकीर्दीतच ' अनंत शिवाजी ' उद्योगाला काळ मोठा कठीण आला. अवघा उद्योगसमूह ' न भूतो न भविष्यति ' अशा आर्थिक संकटात सापडला. धंद्याचा डोलारा आता कोसळतो की काय, अशी अवस्था झाली आना कारभारात निष्णात होते. व्यापार हाकण्यात वाकबगार होते. पण प्रसंगच असा बाका होता की, भल्याभल्यांच्या तोंडचे पाणी पळाले. नगद भांडवलाची उभारणी केल्याशिवाय एक पाऊलही पुढे पडणे शक्य नव्हते. अनंत शिवाजीच्या उदार आश्रयाने उदयाला येऊन प्रती अनंत शिवाजी बनलेले अनेक उद्योजक मुंबई शहरात नांदत होते. अनंत शिवाजीवरील या कठीण प्रसंगी, मदतीसाठी त्यांच्याकडे आनानी पदर पसरला; ' अनंत शिवाजी ' ही मूळ संस्था वाचविण्याचे श्रेय घ्यावे म्हणून अनेक उद्योगपतींच्या नाकदुऱ्या काढल्या; अनेकांना कळवळून हाका दिल्या; पण त्या सर्व व्यर्थ गेल्या !

आनांच्या उदात्त प्रयत्नांत त्यांना कोणाकडून शाब्दिक सहानुभूतीही मिळेना. उलट बुडत्याला वाचविण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांच्याच अंगावर

उलटून सर्वनाश होणार असे भावित सर्वजण वर्तवू लागले. इतकेच नव्हे तर आनांनी या आत्मघातकी प्रयत्नापासून परावृत्त व्हावे म्हणून वर तोंड करून उपदेश करू लागले. पण 'सताहि संदेहपदेषुवस्तुषु प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः ।' या न्यायाने आनांनी आपल्या मनोदेवतेचा कौल मानला आणि ते झपाटल्यासारखे कामाला लागले. 'अनंत शिवाजीला' वाचविण्यासाठी ते आकाशपाताळ एक करू लागले. पण आकाशच फाटले होते, तेथे एकटे आना ठिगळे लावून लावून किती लावणार! तरीही 'धीरस्तत्र न मुह्यति' वृत्तीचे आना प्रयत्नांची पराकाष्ठा करू लागले. प्रत्यही घेरावणाऱ्या भयानक संकटाशी छातीची ढाल करून मुकाबला करू लागले. वेतन मोबदला वेळेवर न मिळाल्यामुळ अनंत शिवाजी कारखान्यात असंतोष शिगेला पोहोचला होता. कामगारवर्ग कारभाऱ्यावर रुष्ट झाला होता. रात्र वैऱ्याची होती. पण आनांनी 'अनंत शिवाजीला' वाचविण्याचा एकच ध्यास घेतलेला होता. त्यांना दुसरे कशाचेही भान राहिले नव्हते. नवरात्रातील एक दिवस. दुपारी बाराच्या समयाला आना तंत्रीतज खतर गल्लीतून सी. पी. टँकच्या बाजूला जात होते. इतक्यात त्यांच्यावर भयानक सुरीहल्ला झाला. आना धाडकन भूमीवर कोसळले ते परत उठले नाहीत. अशा रीतीने 'अनंत शिवाजीला' वाचविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा करणारा एकटा मुरारबाजी स्वामिकार्यात धारातीर्थी पतन पावला!

आनांच्या त्या अपघाती निधनानिमित्त ती लोकसभा होती. सभागृह जनसमुदायाने चिक्कार भरून गेले होते. आपल्याकडे शोकसभा असली तरी वाचिवीर वक्तृत्व गाजविण्याची संधी सोडत नाहीत. परिणामी रटाळ आणि असंबद्ध भाषणांची जणू शर्यतच लागते! आनांबद्दलच्या आपुलकीमुळे मी त्या सभेस उपस्थित होतो; पण भाषणे ऐकण्याची मला उत्सुकता नव्हती. भाषणे सुरू होऊन पाच–दहा मिनिटे लोटली असावी, इतक्यात एक अपरिचित धारदार गंभीर आवाज माझ्या कानात घुमला. मी चमकून व्यासपीठाकडे पाहिले. एक पंचविशीतला तरूण भाषण करीत होता. डोकीवर कशीतरी ठेवली काळी टोपी, अंगात शर्ट

आणि पायात लेंगा अशा पोशाखात उंचेल्यासा तो वक्ता मान किंचित कलती करून बोलत होता. त्याला काहीतरी खास सांगावयाचे होतें. आणि ते तो पोटतिडकीने, आवेशाने आणि ठामपणे सांगत होता. त्या तरुणाच्या वक्तृत्वाने मी चांगलाच प्रभावित झालो व त्याचा परिचय असावा असें मला वाटू लागले. मी तेथेच त्याची चौकशी केली. तेंव्हा आजगावकर उपनावाचा तो एक शाळा मास्तर असल्याचे मला समजले आणि माझा परिचयप्रयत्न तेवढ्यावरच संपला.

सन १९५५ च्या सप्टेंबर महिन्यातील असाच एक रविवार होता त्याच गौड ब्राह्मण सभागृहात अशीच एक शोकसभा भरली होती. सभागृह सोडण्यापूर्वी मी इकडे तिकडे पाहात असताना एका गृहस्थाने नुकताच प्रकाशित झालेला एक नवीन ग्रंथ मला दाखविला. त्या ग्रंथाचे 'कुडाळदेशकरांचा तेजस्वी इतिहास' हे नाव पाहून माझे कुतूहल जागृत झाले. मोठ्या उत्सुकतेने मी ग्रंथकर्त्याचे नाव पाहिले तर 'गुं. फ. आजगावकर' असे ते होते. दोन वर्षामागे याच सभागृहात ज्यांच्या वक्तृत्वगुणांचे मला प्रथम दर्शन झाले होते, तेच आजगावकर मास्तर त्या ग्रंथाचे लेखक होते. त्यांनीच एवढ्या तरुण वयात तो संशोधनात्मक ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशित करण्याची कौतुकास्पद कामगिरी केली होती. मास्तरांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू ग्रंथरूपाने प्रकाशात आला होता. वर्षामागून वर्षे पुढे सरकत होती. अधून मधून मास्तरांच्या साहित्यिक कार्याबद्दल आणखीही माहिती माझ्या कानावर येत होती. पण उत्कट इच्छा असूनही मास्तरांची आणि माझी तोंडओळखही होऊ शकली नव्हती. ओळखीदेखी, गाठीभेटी ऋणानुबंध असल्याशिवाय होत नाहीत असे म्हणतात त्याचा प्रत्यय मला येत होता.

सन १९६० चे संवत्सर तोंडावर आले होते. कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीची प्रातिनिधिक संस्था 'गौड ब्राह्मण सभा' पासष्ट वर्षांची झाली होती. सार्वजनिक संस्थांच्या वयाबरोबर त्यांची ताकद वाढत जाते असे म्हणतात. पण आमच्या 'गौड ब्राह्मण सभे'बाबत मात्र प्रकार अगदीच उलटा झाला होता. साठी उलटण्यापूर्वीच तिच्या ताकदीला ओहोटी लागली आणि क्षीण होता होता आता ती अगदी

मरणोन्मुख झाली होती. सभेचे नियतकालिक 'गौड ब्राह्मण' तर खंगून खंगून कित्येक वर्षांमागे मरूनही गेले होते. तथापि, या विपरीत-पणाची यत्किंचितही खंत त्या वेळच्या समाजधुरीणांना वाटत नव्हती. किंबहुना त्यांच्याच अदूरदृष्टी, दुराग्रही, आडमुठ्या धोरणापायी या भारदस्त ज्ञातिसंस्थेची अशी शोचनीय अवस्था झाली होती. मेलेले 'गौडब्राह्मण' पुनर्जीवित होणे अशक्य नव्हते. पण मरायला घातलेली गौड ब्राह्मण सभा जर का मेली असती तर ती पुन्हा वर उठणे मात्र अशक्य कोटीतले होते. डोळयांना दिसणारे तिचे ते मरण टाळण्याच्या पलीकडचे होते; कारण ज्यांनी तिचे रक्षण करायचे तेच तर तिच्या जिवावर उठले होते, 'तात करी दुहिताविनाश' म्हणतात ना, अगदी तशी अवस्था झाली होती.

कुडाळदेशकर गौड ब्राह्मण ज्ञातीतील एक थोर समाजसेवक, प्रख्यात शिक्षणतज्ञ कै. प्रो. पांडुरंग भिकाजी तथा तात्यासाहेब नाईक यांनी आपली अवधी हयात 'गौड ब्राम्हण विद्यावृध्दी संस्थे'च्या सेवेला वाहिली. तात्यासाहेबांचे सुपुत्र श्री. दत्तात्रय पांडुरंग नाईक, M. A. यांचे व्यापारउद्योगानिमित्त मंगलोर भागात वास्तव्य होते उद्योगनिवृत्त झाल्यावर दत्तोपंत मुंबईत येऊन स्थायिक झाले. आपल्या वडिलांकडून त्यांना सार्वजनिक कामाचा वारसा मिळाला होता. मंगळूरला ते यथा-शक्ती, यथामती समाजकार्य करीतच होते. व्यवसायनिवृत्त होऊन ते मुंबईत आले तेव्हा त्यांची साठी उलटून गेली होती. तरीही त्यांच्या पिंडातली समाजसेवावृत्ती टिकून राहिली होती. दत्तोपंतांच्या मुंबई आगमनाच्या दरम्यान आसन्नमरण झालेली 'गौड ब्राम्हण सभा' मर-णाची वाट पाहात जगत होती. आपल्या ज्ञातीच्या एका जुन्या प्रातिनिधिक संस्थेचा असा अधःपात का व्हावा याचा बोध दत्तोपंताना होईना. त्यावेळचे निष्क्रिय समाजधुरीणच जाणूनबुजून संस्थेला मूठमाती देण्याच्या तयारीत होते, ती वस्तुस्थिती दत्तोपंतांना समजली, तेव्हा त्यांच्या तळपायाची आग मस्तकाला गेली. त्या पुढाऱ्यांच्या आत्म-घातकीपणाचा त्यांनी कडाडून निषेध केला आणि गौड ब्राम्हण सभेला वाचविण्यासाठी ते झपाटल्यासारखे कामाला लागले.

दत्तोपंत मुम्बईत नवीन होते. जुन्या अपेशी नेतृत्वाचा आपल्या

योजनांना हमखास विरोध होणार हे त्यांना माहीत होते म्हणून त्यांनी समाजातील सर्व स्तरातील लोकांचे मेळावे भरविले. अनेक चर्चा-सभा आयोजित केल्या. सर्व समस्यांचा सांगोपांग, दिलखुलास ऊहापोह व्हावा अशी व्यवस्था केली. दत्तोपंतांच्या सभांना अमाप गर्दी लोटू लागली. सभा रंगू लागल्या. अनेक वाचिवीरांनी वक्तृत्वाची हौस फेडून घेतली. 'गौड ब्राह्मण' नियतकालीक पुन्हा सुरू झालेच पाहिजे.' 'गौड ब्राह्मण सभा जिवंत राहिलीच पाहिजे.' अशा घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले. ज्ञातिबांधवांचा ओसंडून जाणारा हा उत्साह पाहून दत्तोपंत हरखून गेले. त्यांच्या समाजकार्याच्या हाकेला साद देऊन अनेक कार्यकर्ते आपण-हून पुढे आले. त्यात आजगांवकर मास्तर आघाडीवर होते. दत्तोपंतांनी आता प्रत्यक्ष कामाच्या दिशेने पाऊल उचलले. आणि एकेक कार्यकर्ता हळूहळू काहीना काही कारणाने काढता पाय घेऊ लागला. कामाच्या विरुद्ध दिशेने जणू त्यांची पळापळच सुरू झाली. त्या अद्वितीय पळापळीत एक आजगावकर मास्तर मात्र ठामपणे दत्तोपंतांपाशी उभे राहिले. साठीच्या वर असलेले दत्तोपंत नाईक. आणि चाळीशीतील उत्साही आजगावकर मास्तर यांची जोडी जमली आणि 'आलात तर तुमच्या-सह, न आलात तर तुमच्याशिवाय, आडवे आलात तर तुम्हाला झुगारून आमचे ध्येय आम्ही गाठणारच' अशा ठाम निर्धाराने गौड ब्राम्हण सभेच्या कार्यासाठी त्या दोघांनी भ्रमंती सुरू केली. त्या भ्रमंतीमध्ये मास्तरांना घेऊन दत्तोपंत एका सायंकाळी माझ्या खोलीवर आले.

मी दत्तोपंत नाईकांचा कुटुंबियच होतो. त्यांचा व माझा चांगला घरोबाही होता. त्यांच्या बरोबर आजगावकर मास्तरांना पाहून मला विशेष आनंद झाला. मी म्हणालो, 'अहो आजगावकर, मी आज किती तरी वर्षे तुम्हाला भेटण्यासाठी उत्सुक आहे, आज तो योग जुळून आला.' त्यावर मास्तर म्हणाले, 'अहो, माझी पण तशीच अवस्था आहे. मी तीनचार वेळा तरी तुम्हाला भेटण्याच्या हेतूने इकडे येऊन गेलो पण गाठ पडली नाही. गौड ब्राम्हण सभेच्या कामात सहकार्य मागण्यासाठी आज आम्ही दोघे तुमच्याकडे आलो आहोत. तुम्ही ते नाकारणार नाही याबद्दल आमची खात्री आहे.' **गौड** ब्राम्हण सभेचा आणि नियत-

कालिकाचा झालेला अध:पात मी माझ्या डोळ्यांनी पाहिला होता. त्यावेळचे सभेचे चालक एकमेकांवर मनसोक्त धुळवड साजरी करण्यात गुंतल्यामुळे कसलेही विधायक कार्य करण्यास त्यांना फुरसद नव्हती. सभेच्या त्या गढूळ वातावरणापासून शक्यतो चार हात दूर राहण्याचा माझा निश्चय होता. पण आता दत्तोपंत आणि आजगावकर मास्तरांच्या जोड आवाहनामुळे तो निश्चय डळमळला आणि मी गौड ब्राम्हण सभेच्या कामात कसा ओढला गेलो हे माझे मलाच समजले नाही.

गौड ब्राम्हण सभेच्या निमित्ताने आजगावकर मास्तरांची व माझी खरी गाठभेट झाली ही भेट नवीनच झालेली होती. पण का कोणास ठाऊक, आपली कैक वर्षाची जुनीच मैत्री आहे असे आम्हा दोघांनाही वाटू लागले. 'गौड ब्राह्मण' नियतकालिकाची उभारणी आणि गौड ब्राह्मण सभेचे उत्थापन याबाबतची सर्व कामे आम्ही दोघेजण एकदिलाने करू लागलो. 'गौड ब्राह्मण'चे संपादकत्व माझ्याकडे आले. तथापि, नियतकालिक प्रसिद्धीच्या ज्या अनेक यातायाती कराव्या लागतात त्याचा सर्व भार मास्तरांनी स्वखुषीने स्वत:च्या माथी घेतला. सन १९६१ च्या संक्रांतीला नव्या 'गौड ब्राह्मण'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. त्या प्रसिद्ध झालेल्या 'गौड ब्राह्मण'चे रूप आणि थाट पाहून दत्तोपंतांच्या विरोधकांची दातखिळीच बसली ! नव्या 'गौड ब्राह्मणा'ने थोड्याच अवकाशात बाळसे धरले. 'गौड ब्राम्हण सभा' ही हां हां म्हणता ताजीतवानी आणि टवटवीत झाली. तथापि, या यशामुळे दत्तो-पंतांचे विरोधक अत्यंत अस्वस्थ झाले. आपल्याला जे जमले नाही ते नवीन नेतृत्वाने करून दाखविले ह्याचे त्यांना फार वैषम्य वाटले. 'गौड ब्राम्हण'चे परखड संपादकीय धोरणही त्यांना फार तिखट झाले. आणि म्हणून त्यांनी दत्तोपंतांसकट आम्हा सर्व कार्यकर्त्यांवर निंदानालस्तीची झोड उठवली. त्यांच्याशी दोन हात करण्यात वेळ घालवणे म्हणजे 'गौड ब्राम्हण'ची पिछेहाट करण्यासारखे होते. म्हणून मास्तरांनी आणि मी 'गौड ब्राम्हण'च्या कार्यातून मुक्तता करून घेतली.

गौड ब्राम्हण सभेचे काम चालू असतानाच मी लिहिलेल्या कुडाळी मराठी 'गजालीन् घोव खाल्लो' प्रहसनाचे हस्तलिखित

मास्तरांच्या दृष्टीस पडले. मास्तरांनी ते तात्काळ प्रकाशित केले. त्याचवेळी त्यांना कोकणी बोलीभाषांच्या संशोधन केंद्राची आवश्यकता तीव्रतेने जाणवली. कोकणी बोलीभाषांच्या आधारे कोकणचा सांस्कृतिक इतिहास शोधण्याची कल्पना त्यांनी माझ्यापाशी बोलून दाखविली. अनेक विद्वान भाषातज्ञांशी याबाबतीत आमची साधक–बाधक चर्चा झाली आणि सन १९६० च्या विजयादशमीला 'कोकण–मराठी–डायलेक्ट्स रिसर्च इन्स्टिटयूट' ही आमची संस्था जन्माला आली. संस्थेच्या जन्मापासूनच प्रख्यात भाषातज्ञ प्रि. कृष्णाजी पांडुरंग तथा नानासाहेब कुलकर्णी ह्यांचा तिला हार्दिक पुरस्कार लाभला. तसे पाहता नानासाहेब ही 'कृष्णाकाठची माती', पण आमच्या कोकण-सागरकाठच्या मातीशी एकरूप झाली! या समयाला नानासाहेब सत्तरीच्या घरात होते. त्यांची शरीर प्रकृतीही अस्वस्थच होती. तरीही त्यांनी मोठ्या उत्साहाने संस्थेचे नेतृत्व पत्करले१९६२ च्या नोव्हेंबरात संस्थेतर्फे 'Rise & Decline of Dashawatar' ही संशोधनपुस्तिका नानासाहेबांच्या अध्यक्षतेखाली प्रकाशित झाली. प्रकाशन समारंभाच्या-वेळी नानासाहेबानी संस्थेला मोलाचे मार्गदर्शन केले. त्यानंतर थोड्याच अवधीत संस्थेच्या पायाभरणीत मोलाची भर घालून नानासाहेब परलोकवासी झाले.

इन्स्टिटयूटच्या कामानिमित्त मास्तरांची आणि माझी भेट जवळजवळ नेहमीच होऊ लागली. त्यांच्या भाई जीवनजी लेनमधल्या घरी माझे जाणे येणे वाढले. १९६३ च्या मे महिन्यातील रविवारचा दिवस होता. रविवारी मास्तर सहसा घरी भेटत नसत. तथापि अगदी निकडीचे काम असल्यामुळे मी त्यांच्या घरी गेलो. मास्तरांना घरी पाहून मला हायसे वाटले. पण ते माझे हायसे वाटणे फार वेळ टिकले नाही. मास्तरांचे त्यावेळचे ध्यान पाहून मी मनात चरकलो. मास्तर फक्त शरीरानेच घरी होते, त्यांचे मन कोठे भरकटत होते ते फक्त एका देवालाच ठाऊक! मी ज्यांना नित्य भेटत होतो ते आजगावकर मास्तर हे नव्हेत असे मला वाटले. मास्तरांना केव्हाही भेटावे आणि काही काम सांगावे, त्यांचा चेहरा आनंदाने आणि उत्साहाने उजळून

निघत असे. 'होय, करू या ' चला जाऊ या ' अशा उत्तेजक शब्दांनी ते कामाचे स्वागत करीत असत. पण आज त्यांचे कशातच लक्ष नव्हते. त्यांचा निस्तेज रडवेला चेहरा पाहून मला अगदी अपराध्यासारखे झाले. काहीतरी गंभीर प्रसंग आहे हे ओळखून मी त्यांच्याजवळ जाऊन बसलो. मला जवळ पाहाताच मास्तरांना हुंदका आला. डोळ्यावाटे प्रवाह सुरू झाला. त्यांच्या मुखावाटे शब्द आले, 'गेले हो गेले; जगन्नाथराव भोसले गेले ! सर्व काही जिथल्या तिथे राहिले.'

त्या दिवशीच्या बातमीपत्रात जगन्नाथराव भोसले वारल्याचा उल्लेख वाचल्याचे मला स्मरले. पण भोसल्यांच्या मरणाचा आजगावकर मास्तरांवर असा विपरीत परिणाम का व्हावा याचा उलगडा मात्र मला होईना. मी गोंधळून गेलो, तथापि, भोसले म्हणजे काही मास्तरांचे कुटुंबीय नव्हते, ह्या गोष्टीचे त्यातल्या त्यात मला समाधान वाटले. मी मास्तरांना म्हणालो, 'अहो, भोसल्यांच्या मरणाने इतके व्यथित होण्यासारखे काय आहे ?' त्यावर मास्तरांना दुःखाचा जास्तच उमाळा आला. ते रडत रडतच म्हणाले, 'जगन्नाथरावांचे आणि माझे नाते काही वेगळेच होते. ती एक ऋणानुबंधाची गाठ होती. तुम्हाला त्याची कल्पना कशी येणार ?' असे बोलत असतानाच मास्तर झटका आल्यासारखे सावरून बसले आणि त्यांनी मोठ्या जिव्हाळ्याने आणि उत्साहाने आपल्या जीवनगाथेतील 'सेनापती जगन्नाथराव भोसले ' अध्याय मला ऐकविला.

आजगावच्या तिरोडें वाडीतील जगन्नाथराव भोसले घराण्याचा मास्तरांच्या प्रभुमतकरी घराण्याशी पिढनपिढ्याचा घरोबा होता. जगन्नाथराव लहानपणीच दुसरीकडे दत्तक गेल्यामुळे त्यांचा आणि मास्तरांचा परिचय नव्हता. दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटच्या पर्वात जपानच्या नागासाकी आणि हिरोशिमा या बेटांवर अमेरिकेने अणुबॉम्ब कारवाई केली. त्यामुळे जपान दाती तृण धरून शरण आला. परिणामी पूर्व आघाडीवर जपानच्या आधारावर झुंजणाऱ्या आझाद हिंद सेनेचाही दारुण पराभव झाला. देशासाठी प्राणपणाने लढता लढता अनेक शूरवीर धारातीर्थी पडले. परंतु जे जिवंत राहिले त्या सर्वांना इंग्रजांनी युद्धकैदी

म्हणून भारतात परत आणले व दिल्लीच्या लाल किल्ल्यात चौकशी होईपर्यंत डांबून ठेविले. या गुन्हेगारांमध्ये कित्येक सेनाप्रमुखांचाही समावेश होता. त्यापैकी 'धीलन' आणि 'शहानवाजखान' या दोघा सेनाप्रमुखांचा वर्तमानपत्रातून फार मोठा गाजावाजाही होत होता. याचवेळी मास्तरांच्या परिचयाचे जगन्नाथरावांचे बंधू प्रतापराव त्यांना योगायोगाने मुंबईत भेटले व त्यांनी जगन्नाथराव लाल किल्ल्यात असल्याचे मास्तरांना सांगितले. 'आझाद हिंद सेने'चे प्रमुख शिल्पकार जगन्नाथराव भोसले लाल किल्ल्यात युद्धगुन्हेगार म्हणून बंदिस्त असताना त्याबद्दलची साधी माहितीसुद्धा आम्हा महाराष्ट्रीयांना असू नये याची तिडीक मास्तरांच्या मस्तकात गेली आणि त्यासरशी 'लाल किल्ल्यातील महाराष्ट्रीय' या मथळ्याखाली त्यांनी एक लेख लिहिला व तो जगन्नाथरावांच्या छायाचित्रासह 'नवशक्ति' दैनिकाकडे पाठवून दिला.

'नवशक्ती'ने चित्रासकट तो लेख प्रमुख भागी छापला. तो लेख छापला मात्र आणि बांद्यापासून चांद्यापर्यंत अखिल महाराष्ट्रात मोठा हलकल्लोळ उडाला ! आझाद हिंद सेनेचे प्रमुख शिल्पकार सेनापती जगन्नाथराव भोसले युद्धगुन्हेगार म्हणून दिल्लीच्या लालकिल्ल्यात डांबले असताना त्यांची नुसती माहितीसुध्दा आपल्याला असू नये ही गोष्ट महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सर्वांच्याच मर्मी लागली. लेखक आजगावकरांनी सेनापती भोसल्यांबद्दल जास्तीत जास्त माहिती पुरवावी म्हणून 'नवशक्ति' दैनिकाकडे लोकांनी लकडा सुरू केला. मास्तरांनीही अविश्रांत श्रम करून जसजशी माहिती मिळाली तसतशी लेख लिहून लोकांची जिज्ञासा पूर्ण केली. युध्दगुन्हेगारांवर न्यायालयात खटले चालू होते. युध्दगुन्हेगारांना देहान्त शिक्षा ही ठरल्यासारखीच होती. तशातही पराभूत शत्रूंना इंग्रज कधीही क्षमा करीत नाहीत, असा इतिहासाचा निर्वाळा होता. जगन्नाथरावांसारख्या पराभूत सेनाप्रमुखाला देहान्त शासन हे तर ठरल्यासारखेच होते. म्हणून त्यांच्या भवितव्याबद्दल महाराष्ट्रात काळजीचे वातावरण निर्माण झाले होते.

युध्दगुन्ह्याची सुनावणी चालू झाली. अखिल भारतीय जनता बचावाच्या बाजूने होती, पण त्याने भागण्यासारखे नव्हते. सुदैवाने

भुलाबाई देसाईसारखे खंदे कायदेपंडित बचावाच्या बाजूने न्यायालयात उभे राहिले. बराच काळ 'भवति न भवति' झाली आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढाई करणे हा गुन्हा नसून, तो प्रत्येकाचा जन्मसिध्द हक्क असल्याचे शाबित झाले. जगन्नाथराव निर्दोष सुटून मुंबईत आले. त्यांच्या भवितव्याच्या काळजीने खंगलेली त्यांची पत्नी चंद्रिकादेवी, त्यांच्या वाटेकडे डोळे लावून होती. तिच्या डोळ्यांचे पारणे फिटले. मास्तरांच्या नवशक्तीतील लेखामुळे चंद्रिकादेवीचा व त्यांचा चांगला परिचय झाला होता. चंद्रिकादेवीने मास्तरांची आणि जगन्नाथरावांची भेट घडवून आणली. त्या पहिल्याच भेटीत त्या दोघांनाही आपले जन्मजन्मांतरीचे नाते उमगले. जगन्नाथरावांनी मास्तरांना आपल्याजवळ ठेवून घेतले. त्यांनी आझाद हिंद सैनिकांच्या पुनर्वसनाचे काम हाती घेतले होते. त्यात प्रचार कार्याचे सर्वाधिकार त्यांनी मास्तरांना दिले. हे प्रचारकार्य करीत असतानाच मास्तर जगन्नाथरावांच्या अगदी निकट सहवासात आले. संधी साधून मास्तरांनी जगन्नाथरावांकडून त्यांच्या सर्व पूर्व आघाडीवरील रोमहर्षक संग्रामाची समग्र कथा वदवून घेतली. वेळोवेळी त्यांची टाचणे केली व त्या टाचणांवरून जगन्नाथरावांचे एक नमुनेदार चरित्र तयार केले.

मास्तरांनी लिहिलेले चरित्र प्रकाशित होण्यास वेळ लागणार नव्हता. पण जगन्नाथराव लोकसभेच्या निवडणुकीत यशस्वी झाले आणि मंत्री होऊन दिल्लीला गेले. त्या अवधीत मास्तर शिक्षक होऊन मुंबईत राहिले. दिल्लीहून मास्तरांना जगन्नाथरावांनी आपल्याकडे येण्याबद्दल निरोप पाठविले; पण मास्तर काही दिल्ली गाठू शकले नाहीत. त्यांनी लिहिलेले चरित्रही तसेच पडून राहिले. हा हा म्हणता काळ गेला आणि सेनापती भोसले निघूनही गेले ! आता तर चरित्र प्रकाशित होण्याची शक्यताच नाहीशी झाली. याच गोष्टीचे शल्य मास्तरांना जास्त बोचू लागले. ते मला म्हणाले, 'नाईक, सेनापतीचे मराठी चरित्र प्रकाशित करणे माझ्या शक्तीबाहेरचे आहे. या मराठी चरित्रावरून तुम्ही जर त्यांचे एक छोटेसे इंग्रजी चरित्र करून दिलेत तर ते मी सुलभतेने छापू शकेन आणि भोसल्यांच्या ऋणातून मुक्त होईन.'

मी ती कामगिरी चटकन अंगावर घेतली तेव्हा मास्तरांचा कोमेजलेला चेहरा उजळला. यथाकाल इंग्रजी चरित्रें तयार झाले. सेनापतीच्या प्रथम वर्षश्राद्धाच्या दिवशी नामदार बाळासाहेब सावंत यांच्या अध्यक्षतेखाली मास्तरांनी ते प्रकाशित केले.

कोकण रेल्वेचे आद्यप्रवर्तक श्री. अ. ब. वालावलकर हे एक ऋषितुल्य व्यासंगी विद्वान संशोधक होते. मास्तरांचा आणि त्यांचा अनेक वर्षांचा स्नेहसंबंध होता. 'कोकण मराठी डायलेक्टस रिसर्च इन्स्टिटयूटच्या' जन्माचे वेळी अ. ब. साठीच्या वर होते. तरीही एखाद्या विशीतल्या तरुणाच्या तडफेने त्यांनी संस्थेच्या संशोधन कार्याला सुरुवात केली. त्यांनी संस्थेसाठी खास संशोधनपर लेख लिहिले. व्याख्याने दिली. इतर अनेक गुणांबरोबर अ. ब. च्या ठिकाणी कवित्वही होते. भगवद्गीता त्यांच्या नित्य पठणात असे. भगवद्गीतेच्या नित्य चिंतनामुळे त्यांची एकदा तंद्री लागली आणि त्या तंद्रीत त्यांनी भगवद्गीतेच्या सर्व अध्यायांचा कुडाळी मराठी भाषेत समश्लोकी अनुवाद केला. तो त्यांनी संस्थेला अर्पण केला. संस्थेकडून तो प्रकाशित व्हावा म्हणून ते तातडीने प्रयत्नाला लागले. पण आमची तातडी काही चालली नाही. दिवस असेतसे गेले. अ. ब. ची कुडाळी गीता अप्रकाशितच राहिली !

१९७० च्या विजयादशमीला कोकण मराठी डायलेक्टस संस्थेला दहा वर्षे पूर्ण होत होती. दरम्यान मास्तरांच्या जबाबदाऱ्या फारच वाढल्या होत्या. येथील तुकाराम लक्ष्मण देसाई ॲल्युमिनियम दुकानाची एकमेव मालक व चालक श्रीमती राधाबाई तुकाराम मास्तरांची आत्या होती. मास्तर राधाबाईच्या घरातच एका खोलीत राहात होते. तरीही राधाबाईच्या दुकानांच्या कारभारापासून कटाक्षाने ते चार हात दूर राहिले होते. मास्तर हाडाचे शिक्षक होते. आपली प्राणप्रिय शिक्षकी संभाळून जेवढे समाजकार्य करता येईल तेवढे ते मोठ्या उत्साहाने करीत असत. पण अगदी जवळ असूनही राधाबाईच्या प्रापंचिक गोष्टीत त्यांनी कधीही लक्ष घातले नव्हते. १९६५ मध्ये राधाबाईच्या दायादानी तिला छळण्याचा उच्चांक गाठला. तेव्हा सात्त्विक संतापाच्या तिरीमिरीत मास्तरांनी आपली आवडती शिक्षकी अर्ध्यावर सोडली

आणि एकाकी राधाबाईच्या जीवनसंघर्षात स्वत:ला झोकून दिले. परिणामी राधाबाईचे दुकान चालवण्याची जबाबदारी त्यांच्या एकट्यावर येऊन पडली. मास्तरांना दुकानदारीचा श्रीगणेशासुध्दा येत नव्हता. पण स्वत:च शिक्षण घेऊन थोड्याच अवधीत दुकानदारीचे सर्व बारकावे त्यांनी आत्मसात केले. तेव्हापासून मास्तरांच्या जबाबदाऱ्या सारख्या वाढतच होत्या. तरीही त्यांनी कोकण मराठी डायलेक्टस संस्थेचा दशवार्षिकोत्सव भव्य प्रमाणावर आयोजित केला. त्या उत्सवाला साजेशी एक स्मरणिकाही तयार केली. त्यात अ. ब. वालावलकरांचा एक संशोधन लेख समाविष्ट केला. दशवार्षिकोत्सवानंतर दोनच महिन्यांनी किरकोळ आजारात दुर्दैवाने अ. ब. चे निधन झाले.

अ. ब. च्या मृत्यूसमयी मास्तर त्यांच्या जवळ होते. अ. ब. क्षीण आवाजात म्हणाले, ‘आजगावकर, कुडाळी गीता प्रकाशात आली नाही ती प्रकाशित होती तर बरे होते.’ अ ब. चा जीव त्यांच्या कुडाळी गीतेत अडकला होता. हे मास्तरांनी जाणले. तात्काळ, ‘मी तुमची गीता प्रसिध्द करीन’ असे वचन त्यांनी त्याठिकाणी दिले आणि अ. ब.नी समाधानाने प्राण सोडला. कोकण मराठी डायलेक्टस् संस्थेच्या वतीने अ. ब. च्या निधनानिमित्त शोकसभा झाली. त्याच सभेत अ. ब. चे आत्मचरित्र, त्यांचे इतर लेख व त्यांची कुडाळी गीता मिळून अ. ब, वालावलकर स्मृतिग्रंथ त्यांच्या प्रथम श्राध्ददिनापर्यंत छापावा असे एकमताने ठरले मास्तर आणि मी संकल्पित ग्रंथासाठी निधी जमविण्याच्या कामास लागलो निधी जमू लागला, देणगीची आश्वासनेही मिळू लागली. अ. ब. चा वर्षश्राध्ददिवस जवळ येऊ लागला. पण ग्रंथ प्रकाशित होण्याचे लक्षण काही दिसेना. इतक्यात माझ्या योगक्षेम व्यवसायात उलथापालथ होऊन पोटासाठी मी मुंबईपासून दूर सासवड (पुणे) गावी गेलो. सासवडला असताना कामाच्या धबडग्यात कोकण मराठी डायलेक्टस् संस्था मास्तर, अ. ब. वालावलकर स्मृतिग्रंथ, इत्यादी सर्व गोष्टीचा मला पूर्ण विसर पडला. १९७४ च्या नोव्हेंबरात मास्तरांनी अ. ब. वालावलकर स्मृतिग्रंथाचे पार्सल मला सासवड मुक्कामी पाठविले. तो छानदार ग्रंथ पाहून मास्तरांना एकट्याला

मुंबईत त्या ग्रंथासाठी किती यातायाती कराव्या लागल्या असतील याची कल्पना आली. मास्तरांनी स्वतःची विविध व्यवधाने सांभाळून तीनशे पानांचा अ. ब. वालावलकर स्मृतिग्रंथ प्रकाशित केला. अ. ब. ना अंतकाळी दिलेल्या वचनातून मास्तर आता मुक्त झाले होते. पण तेवढे करून स्वस्थ बसतील तर ते आजगावकर मास्तर कसले ?

अ. ब. वालावलकर ग्रंथापाठोपाठ मास्तरांचे मला पत्र आले. त्यात त्यांनी माझी जीवनकथा लिहावी म्हणून आवर्जून लिहिले होते. माझे ग्रामदैवत मोडक्या रवळनाथाच्या कृपेने माझ्याकडून ती कामगिरी पूर्ण झाली माझ्या जीवनकथेचे हस्तलिखित मी लगोलग मास्तरांना पाठवून दिले. १९७५ च्या गोकुळाष्टमीला माझी साठ वर्षे भरत होती. सेवानिवृत्तीमुळे मी सासवडहून मुंबईला परत येणार होतो. व्यवसाय निवृत्तीमुळे नकामी होणाऱ्या माणसांपैकी मी एक होतो. पण मास्तरांनी मोठी गंमतच केली. गोकुळाष्टमीच्या दिवशीच त्यांनी मुंबईत माझ्या साठी समारंभ भव्य प्रमाणावर आयोजित केला. नामदार बाळासाहेब सावंत समारंभाचे अध्यक्ष होते. नवशक्तीचे बापूसाहेब बेहेरे प्रमुख पाहुणे होते. मास्तरांच्या या योजनेमुळे जणू काही मोठी मुर्दुमकी गाजवून मायभूमीला परत येणारा मी कोणी विजयी वीरच होतो, असा माझ्या मुंबईत माघारी येण्याचा गाजावाजा झाला. मास्तरांनी आणखीही कमाल केली. माझ्या जीवनकथेवर त्यांनी संपादकीय संस्कार केले. आणि ' माझी वाटचाल ' या नावाने ती छापूनही काढली. साठीच्या त्या समारंभातच तिचे प्रकाशन झाले. समारंभात माझ्याविषयी बोलताना मास्तर म्हणाले, ' निवृत्तीमुळे नाईकसाहेब आज मोकळे झालेले आहेत. त्यांचे आत्मचरित्रही लिहून झाले आहे; आता त्यांनी महाराष्ट्र-भाषाभूषण ज. र. आजगावकरांचे चरित्र लिहावे.'

मास्तर ' बोले तैसा चाले ' पंथापैकी होते. एका सप्ताहाच्या आत ज. र. आजगावकरांच्या हस्तलिखिताचे एक जाडजूड बाड त्यांनी आणून टाकले. दरम्यान ज. र. आजगावकरांची जन्मशताब्दी तोंडावर आली होती. १८७८ च्या ऑगस्ट महिन्यात ज. र. आजगावकरांचा जन्म झाला. १९५५ च्या ऑगस्टमध्ये सत्त्याहत्तराव्या वर्षी त्यांचे

निधन झाले. त्यांच्या निधनानंतर दोन वर्षांनी त्यांच्या सुनेने त्यांच्या ' प्राचीन मराठी संतकवि ' या प्रासादिक ग्रंथाच्या पाचशे पानाचा पहिला खंड प्रकाशित केला. ज. र. च्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने तरी त्यांचा संपूर्ण ' प्राचीन मराठी संतकवि ' ग्रंथ प्रकाशात यावा अशी तळमळ मास्तरांना लागून राहिली होती. श्री. बापूराव नाईकांच्या पुढाकारामुळे महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाचे, ग्रंथाच्या पाचशे पानांच्या दुसऱ्या खंडाच्या प्रकाशनाला अनुदान मिळाले. कोकण मराठी डायलेक्टस् संस्थेच्यावतीने १९७७ च्या ऑगस्टमध्ये मास्तरांनी तो खंड प्रकाशित केला. ज. र. आजगावकर आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध होता. मास्तरांच्या ज. र. आजगावकर विषयक कामगिरीने साहित्य संघाचे खंदे कार्यकर्ते श्री. वा. रा. तथा भाऊसाहेब ढवळे इतके प्रभावित झाले की त्यावेळेपासून मास्तर भाऊसाहेबांचे एक कुटुंबियच बनून गेले. कोकण मराठी डायलेक्टस् संस्थेच्या कामात मास्तरांना आणि मला प्रत्यक गोष्टीत आता भाऊसाहेबांचे मोलातीत साहाय्य लाभू लागले. मास्तरांनी माझेकडे दिलेला ज. र. आजगावकर लिखितांचा माझा अभ्यास आता पूर्ण झाला होता. त्या हस्तलिखितात ज. र. आजगावकरांचे एका वेगळ्या पद्धतीचे आत्मचरित्रच असल्याचा शोध मला लागला. ' ज. र. चे आत्मचरित्र जर उपलब्ध आहे, तर त्याचे वेगळे चरित्र लिहिण्याचा प्रपंच कशाला?' असे मी मास्तरांना म्हणालो. मास्तरांना माझे म्हणणे पटले. त्यांनी तात्काळ त्या हस्तलिखिताचे ' प्रसिध्द पुरुषांच्या अप्रसिध्द गोष्टी ' ह्या शीर्षकाखाली छानदार संपादन केले बापूराव नाईकांच्या जोडीला आता भाऊसाहेब ढवळेही आमच्या मदतीला होते. त्या दोघांच्या पुढाकारामुळे ज. र. आजगावकरांच्या या आगळ्या आत्मचरित्र ग्रंथालाही महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाचे भरघोस अनुदान मिळाले. १९७८ या ज. र. आजगावकर जन्मशताब्दी वर्षात ९ मे रोजी साहित्य संघ मंदिरात त्या आत्मचरित्राचा भव्य प्रकाशन समारंभ झाला. आता मास्तरांचे सर्व लक्ष ऑगस्टमध्ये होणाऱ्या ज. र. आजगावकरांच्या जन्मशताब्दी समारोहाकडे लागले.

१९६५ मध्ये राधाबाईंनी दुकानधंद्याचा ट्रस्ट केला होता. स्वतः

मॅनेजिंग ट्रस्टी राहून मास्तरांना तिने जोडट्रस्टी नेमले होते. तेव्हापासून दुकानाची सर्व व्यवस्था मास्तरच पाहात होते. राधाबाई मधून मधून मास्तरांना आपला अनुभवी सल्ला देत असे. अशी तेरा वर्षे गेली. ज. र. आजगावकरांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाल्यामुळे मास्तर आनंदात होते. आता लवकरच होणारी ज. र. आजगावकर जन्मशताब्दी भव्य प्रमाणात आयोजित करण्याच्या ते तयारीला लागले होते. ज. र. आजगावकरांविषयी काम सुरु झाल्यापासून मास्तर आणि मुंबई मराठी साहित्य संघाचे भाऊसाहेब ढवळे यांची चांगलीच मैत्री झाली. ज. र. आजगावकर जन्मशताब्दि समारोहाचा तपशील ठरविण्यासाठी त्या दोघांच्या नित्य गाठीभेटी होऊ लागल्या. साहित्य संघात भाऊसाहेबांपाशी बसून घटका दोन घटका घालविल्याशिवाय मास्तरांना चैन पडेना, आणि एकादा दुसरा दिवस मास्तरांची गैरहजेरी लागली तर भाऊसाहेबही कासावीस होत, आणि मग मास्तरांच्या समाचारासाठी त्यांची फोनाफोनी सुरु होई

ज. र. आजगावकरांच्या जन्मशताब्दी समारोहाची तयारी चालली असताना ब्याऐंशी वर्षाच्या वृद्ध राधाबाई अकस्मात आजारी झाल्या. ह्याचवेळी मास्तरांच्या मधुमेहाच्या विकारानेही उसळी घेऊन त्यांना बेजार केले. दुकानाची चिंता आणि राधाबाईंच्या प्रकृतीची चिंता या दोहोंमुळे मास्तरांना स्वतःची चिंता करण्यास अवसर मिळेना. तथापि वेळात वेळ काढून राधाबाईंच्या आजाराच्या चढउताराची बातमी ते भाऊसाहेबांना देत राहिले. राधाबाईंचा तो आजार शेवटचा ठरला आणि २४ मे १९७८ रोजी रात्रौ साडेअकरा वाजता त्या इहलोक सोडून गेल्या. राधाबाईंच्या पार्थीव देहावर अंत्यसंस्कार केल्यानंतर मास्तरांनी भाऊसाहेबांची भेट घेतली आणि ज. र. आजगावकरांच्या जन्मशताब्दीबाबत काहीतरी निश्चित योजना आखण्याची त्यांना विनंती केली. त्यानंतर एक दिवस गेला, दोन दिवस गेले, तीन दिन दिवस गेले, मास्तर साहित्य संघात आले नाहीत. भाऊसाहेब अत्यंत बेचैन झाले. त्यांनी दुकानावर फोन केला. पण त्याठिकाणी फोन कोणी उचलला नाही. तेव्हा ते स्वतः दुकानावर गेले. तो त्यांना दुकान बंद

असल्याचे समजले. मग आजगावकरांचा पत्ता लावण्यासाठी कोकण मराठी डायलेक्टस संस्थेच्या कचेरीवर ते आले. पण तेथेही कोणाची भेट झाली नाही. इतका प्रयत्न करून आजगावकरांची काहीच माहिती न मिळाल्यामुळे भाऊसाहेब अत्यंत अस्वस्थ झाले. ते वैतागून पत्नीला म्हणाले, 'अहो आजगावकरांचे काय झाले? त्यांच्याबद्दल काहीच माहिती मिळत नाही याचा अर्थ काय?' भाऊसाहेबांनी चौकशी करण्याचे सत्र चालूच ठेवले. एक दिवस सायंकाळी मास्तर आणि मी कोकण मराठी डायलेक्टस कचेरीत कागदपत्र पहात असताना भाऊसाहेबांचा टेलिफोन आला, तो मास्तरांना मिळाला. टेलिफोनवर मास्तरांचा आवाज ऐकताच भाऊसाहेबांचा जीव भांड्यात पडला. त्यानंतर लगेच मास्तर आणि मी भाऊसाहेबांच्या घरी गेलो आणि मध्यंतरीच्या काळात घडलेल्या सर्व घटना त्यांच्या कानावर घातल्या.

राधाबाईंच्या मृत्यूच्या सातव्या दिवशी सकाळी मास्तर नित्याप्रमाणे दुकान उघडण्यास गेले तो त्यांना राधाबाईंचे दावेदार पंचवीसतीस लोकांचा फौजफाटा घेऊन दुकानावर चाल करून आलेले दिसले. मास्तरांनी दुकान उघडल्याबरोबर आत घुसून ते काबीज करण्याचा त्यांचा कावा होता. मास्तर दुकान न उघडता तडक पोलीस ठाण्यावर गेले व पोलिसांची मदत घेऊन परत आले. नातेवाईक म्हणविणारांनी दुकानाच्या टाळ्यावर आपली टाळी अगोदरच मारली होती. या गंभीर गुन्ह्याचा पोलिसांनी पंचनामा केला. मास्तरांनी त्यावेळेपासून दुकानावर पोलीस बंदोबस्त राहिल अशी व्यवस्था केली. दुकान दांडगाईने काबीज करण्याच्या तयारीबरोबरच दावेदारांनी कोर्टकचेरीचीही तयारी केली होती. त्यांनी कोर्टाकडून एकतर्फी रिसिव्हर मिळविला आणि एका रात्री साडेआठ वाजता कोर्ट रिसिव्हरच्या बंदी हुकमाची पाटी दुकानावर लटकावली. अशा तऱ्हेने, १९१६ पासून अव्याहत चालू असलेले काळबादेवी येथील तुकाराम लक्ष्मण देसाईंचे दर्जेदार दुकान बेमुदत बंद पाडण्यात त्यांचे वारसदार यशस्वी झाले!

मास्तरांनी निस्वार्थ बुद्धीने दुकानासाठी सर्वस्व अर्पण केले होते. दावेदारांबरोबरच्या राधाबाईंच्या झगड्यात ते एकटे तिच्या बाजूने

प्राणपणाने झुंजले होते. पण त्यावेळी बाई स्वत: खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभी होती. आता बाई हयात नव्हत्या इतकेच नव्हे तर बाईंचा जणू प्राणच असे तिच्या नवऱ्याचे दुकान कोर्ट रिसिव्हरच्या ताब्याने बेमुदत बंद झाले होते. मास्तरांच्या रहात्या घरात राधाबाईंच्या दावेदारांचा धुमाकूळ चालू झाल्यामुळे त्यांना घरही नव्हते. अशा स्थितीत मास्तरांना अन्न गोड वाटेना. दुकानाचे सर्व दस्तऐवज त्यांच्यापाशी होते. पण कोर्टाची पायरी चढल्याशिवाय त्याचा उपयोग काय ? तशात कोर्ट-कचेरीचा मास्तरांना अत्यंत तिटकारा होता. तथापि, राधाबाईंच्या दावेदारांनीच आता कोर्ट-कचेरी सुरू केल्यामुळे, त्याला तोंड देण्यावाचून गत्यंतर नव्हते. दुकान सुरू राहून कोर्ट-कचेरी चालू राहिली असती तरीही मास्तरांना त्यात फारसे काही वाटले नसते. पण कोर्ट-कचेरीतून निर्णय लागेपर्यन्त दुकान बेमुदत बंद रहाण्याने ते बुडण्याचाच धोका निर्माण झाला होता आणि ह्याच गोष्टीचे मास्तरांना मरणप्राय दु:ख झाले. अशा कठीण समयी आपले ग्रामदैवत श्रीदेव वेतोबावर सर्व भार टाकून ते संकटांना सामोरे गेले.

मास्तरांच्या दुकानाची कोर्ट-कचेरी सुरू झाल्यापासून भाऊसाहेब ढवळे यांनी त्यांत बारकाईने लक्ष घातले. मास्तरांना त्यांनी दर्जेदार सॉलिसिटर मिळवून दिला मास्तरांच्या बाजूने पुरावा कितपत भक्कम आहे, ह्याची सॉलीसिटरकडून स्वत: खात्री करून घेतली. दाव्याच्या प्रत्येक सुनावणीच्या वेळी कोर्टाचा निर्णय समजून घेण्यास भाऊसाहेब अधीर होत असत. दिवस भराभर उलटत होते. कोर्टाचा निकाल पुष्कळसा मास्तरांच्या बाजूने लागत होता. पण दुकान पूर्ववत सुरू होण्यासाठी त्याचा काहीच उपयोग होत नव्हता. अशा स्थितीत ज. र. आजगावकरांच्या जन्मोत्सवाची तारीख अगदी नजीक येऊन ठेपली. एक दिवस भाऊसाहेबांना मी त्या गोष्टीचे स्मरण दिले. तेव्हा भाऊसाहेब उसळून म्हणाले, ' आजगावकरांची दुकानात पुनर्स्थापना झाल्याशिवाय मला काही सांगू नका. मी काही ऐकणार नाही आणि करणारही नाही.' त्यानंतर थोड्याच दिवसात मास्तरांची दोन अडीच महिने ससेहोलपट झाल्यावर श्रीदेव वेतोबाने दाव्यातील यश त्यांच्या पदरात टाकले. दुकान पूर्ववत सुरू झाले. त्यादिवशी भाऊसाहेब दुकानात

आवर्जून उपस्थित राहिले. मास्तरांच्या या यशामुळे काळबादेवी बाजारात त्यांची पत पूर्वीच्या दसपटीने वाढली.

१९१६ मध्ये तुकाराम लक्ष्मण देसाईंनी काळबादेवी सारख्या मोक्याच्या ठिकाणी दुकान स्थापले. त्यांच्या पश्चात त्यांची विधवा पत्नी राधाबाई हिने चाळीस वर्षे मोठ्या शर्थीने ते सांभाळले. आपल्या पतीचे दुकान निरंतर चालावे या हेतूने तिने सर्व दुकान उद्योगाचा ट्रस्ट केला. आपल्या हयातीतच चौदा वर्षे मास्तरांना बरोबर घेऊन मॅनेजिंग ट्रस्टी या नात्याने तिने तो स्वतः चालविला. तिच्या मृत्यूनंतर आता मास्तर मॅनेजिंग ट्रस्टी या नात्याने ते दुकान चालवीत आहेत स्व. तुकारामशेठ व राधाबाई यांची आत्मशक्ति त्यांच्या पाठीशी आहे. राधाबाईंच्या दुकानविषयक झगडयात पडल्याने मास्तरांना आपल्या मास्तरकीवर पाणी सोडावे लागून दुकानदारीचा अभ्यास करावा लागला. त्या अभ्यासात अप्रतिम यशस्वी होऊन यथाकाल ते एक दर्जेदार दुकानदार बनले. मास्तरचा दुकानदार झाला ! आजगावकर मास्तरांच्या ह्या स्थित्यंतराकडे पाहिले की पूर्वी एकदा ' गोखल्यांचे रास्ते झाले ' त्या गोष्टीचे स्मरण झाल्याविना राहात नाही.

मास्तरांचे संपूर्ण नाव गुंडू फटू प्रभूमतकरी, आजगांवकर असे आहे. १९१९ च्या सप्टेंबर महिन्यात गोव्याच्या पेडणे महालातील तांबोसे या आजोळगावी त्यांचा जन्म झाला. सुमारे तीनशे वर्षापूर्वी तेरेखोल नदीकिनारीच्या सावंतवाडी संस्थानातील सातोसे गावी अनेक सामंत घराणी नांदत होती. त्यापैकी एकदा एका विकसनशील तरुणाची दृष्टी यदृच्छया नदीच्या पैलतीरावर एका स्थळावर पडली आणि तेथेच खिळून राहिली. बऱ्याच अंतरावरून वहात येणारा एक वहाळ त्याठिकाणी नदीशी संगम करून राहिला होता. पार्श्वभागाला गर्द झाडींनी आच्छादित अशी एक टेकडी उभी होती. टेकडी, वहाळ आणि नदी यांच्या त्रिकोणात सामावलेला तो पाणथळ भूभागही हिरव्यागार वृक्षवेलींनी परिपूर्ण होता. ते मनोहारी दृश्य पाहून त्या सामंत तरुणाची तहानभूक हरपली त्याने मनाशी काही निश्चय केला आणि अधिक काळ न दवडता त्या रम्य ठिकाणी वस्ती करण्यासाठी आपल्या मुलामाणसांसह त्याने

नदीच्या पैलथडी प्रयाण केले. अविश्रांत मेहनत करून अल्पावधीतच मोठ्या कल्पकतेने त्याने एक लहानसा गाव वसविला. त्या गावाला तांबोसे म्हणतात. तांबोसे गोव्याच्या पेडणे महालात मोडते. पण हा गाव वसत असताना पेडणे महाल सावंतवाडी संस्थानाचाच एक घटक भाग होता. सामंत घराण्याची यथाकाल भरभराट झाली. आज तांबोश्यात पंचवीस-तीस सामंत वतनदार घराणी आहेत.

एकोणीसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात शिवराम (भाऊ) बाळकृष्ण सामंत, तांबोश्याचे एक लहानसे वतनदार होते. त्यांचे धोपट-मार्गी शिक्षण झाले नव्हते. पण अनुभवाने ते सुशिक्षित बनले होते. आपल्या वतनावर त्यांचे विलक्षण प्रेम होते त्यांनी स्वतःचे घर बांधले. घराजवळच्या भूमीत माड, पोफळ, आंबा, फणस, रतांबा, काजू इत्यादि उपयुक्त झाडांची लागवड केली. भूमीची सेवा करून मिळेल त्याच्यावर त्यांची उपजीविका होत असे. १८९९ मध्ये त्यांना शांता मुलगी झाली. शांताच्या पाठीवर दोन मुली झाल्या व नंतर १९१४ मध्ये मुलगा रामचंद्र (बाबू) झाला. बाबू तीन वर्षांचा असताना त्याची आई वारली. परिणामी घराचा सर्व भार थोरल्या शांतावर पडला. यथाकाल आज-गावचे फटू रघुनाथ प्रभू आजगावकर यांच्याशी शांताचे लग्न झाले. वडिलांच्या संसाराबरोबर आता पतीचाही संसार सांभाळण्याची जबाबदारी तिच्यावर आली. फटू शांता दांपत्याला दोन अपत्ये होऊन गेली. त्यानंतर मुलगा झाला. त्याचे गुंडू नाव ठेवले. बाबू-गुंडू हे मामा-भाचे, पण त्यांच्या वयात फक्त पांच वर्षांचे अंतर. आपल्यापेक्षा पंधरा वर्षांनी लहान, आईवेगळा बाबू शांताला स्वतःच्या गुंडूप्रमाणेच प्रिय होता. शिवरामभाऊना तीन मुलींवर नवससायासांनी बाबू झाला होता. तथापि, गुंडूकडेच त्यांचा फार ओढा होता त्यामुळे गुंडूचे बालपण तांबोशांत भाऊंच्या संगतीत गेले.

प्राथमिक शिक्षणासाठी भाऊनी गुंडूला बांद्याच्या शाळेत घातले. बांद्याचे पाटकर भाऊंचे आप्त होते. त्यांच्या सहकार्याने भाऊनी गुंडूची रहाण्या-जेवण्याची सोय केली. रविवारच्या सुट्टीत गुंडू तांबोश्याला भाऊना भेटून शाळेसाठी परत बांद्याला जाई. गुंडूच्या शाळेतील

प्रगतीवर भाऊंचे बारीक लक्ष होते. गुन्डूवर उत्तम संस्कार व्हावेत, शिक्षण घेऊन त्याने मोठे व्हावे, आपल्या कुळाचे नाव काढावे म्हणून जे काही करता येईल ते सर्व भाऊ आवर्जून करीत असत. दिवस भरा-भर उलटत होते. गुन्डूच्या शाळेतील प्रगतीने भाऊंना फार समाधान लाभत होते. करता करता गुन्डूची मराठी सातवीची सरकारी परीक्षा जवळ आली. गुन्डू हुशार विद्यार्थ्यांपैकी एक होता. सरकारी परिक्षेत तो शाळेचे नाव काढणार यात कोणालाच शंका नव्हती. फायनल परिक्षेचे तांबोश्याहून सर्वात जवळचे केंद्र मालवणला होते. सावंतवाडी-हून उमेदवारांना मालवणला नेण्यासाठी खाजगी मोटारीची सोय होती. भाऊंनी गुन्डूला सावंतवाडीला पुढे पाठवून दिले व उताराच्या पैशांची व्यवस्था करण्याच्या मार्गाला ते लागले. दरम्यान गुन्डू आजगावला जाऊन आपल्या काकांना भेटला. ते गुन्डूला म्हणाले, 'तू वाडीला ठरल्यावेळी मोटार स्टँडवर जा; पैसे घेऊन मी तेथेच तुला भेटतो.'

मोटार स्टँडवर गुंडूला परिक्षेला जाणारे त्याचे शाळासोबती भेटले. गुन्डू परिक्षेसाठी मालवणला येत आहे हे पाहून त्यांना फार आनंद झाला. गुन्डूची आर्थिक अडचण त्या सर्वांना माहीत होती. वर्गणी काढून गुन्डूच्या उताराच्या पैशांची व्यवस्था करण्यास त्यांनी सुरुवात केली. पण गुन्डूने त्यांना त्याचे काका उताराचे पैसे घेऊन आत्ताच येतील असे सांगितले. वेळ होत चालला तरी काका काही दिसेनात. गुन्डू अगदी रडकुंडीला आला. तसा त्याच्या सोबत्यांनी त्याला वर्गणी घेण्याचा आग्रह चालविला पण ती घेण्यासही तो तयार होईना. आपल्या नशिबात परीक्षा नाही, असे वाटल्यामुळे सुन्न होऊन तो एका बाजूस जाऊन उभा राहिला. एकाएकी कोणीतरी 'गुन्डूऽऽ गुन्डूऽऽऽ' अश्या कळवळून हाका मारीत असल्याचा त्याला भास झाला. त्याने आवाजाच्या दिशेने पाहिले तो आपले वृद्ध आजोबा धावत येत असल्याचे त्याला दिसले.

तांबोश्याहून डोक्यावर ओझे घेऊन गुन्डूला भेटण्यासाठी शिवराम-भाऊ सावंतवाडीला पायी आले होते. त्यांचे सर्वांग घामाने निथळत होते. गुन्डूला वेळेवर भेटता येईल की काय ह्या काळजीने त्यांचा जीव

खालीवर होत होता. गुंडू दृष्टीपथात येताच धावत जाऊन भाऊंनी त्याला मिठीत कवटाळले व म्हणाले, ‘ गुंडूऽ मोटार सुटाक नाय मा ? ह्यां आय्‌शीन दिल्यान् तां खांवक घे, आणि हे नव् रुपाये घे. जपान ठेव, काल मनीआर्डर इलीऽ.’ शिवरामभाऊंची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. जाडेभरडे अन्नसुद्धा दोन वेळ पोटभर मिळण्याची पंचाईत पडे. पण भाऊ मनाचे श्रीमंत होते. आपल्या कष्टाचे नारळ, सुपारी, आंबा, फणस इतरांना ते सढळ हाताने देत असत. पण एखाद्या गरजूला एखादा पैसा उचलून देणे त्यांना शक्य नव्हते. गुंडूला उतारासाठी देण्यास आपल्यापाशी पैसा नाही, ही गोष्ट त्यांच्या मनाला फार लागली होती. तरीही गुंडूची परीक्षा पैशावाचून बुडणार नाही अशी त्यांना खात्री वाटत होती.

मुंबईच्या कुडाळदेशकर गौड ब्राह्मण निराश्रित सहाय्यकारी फंडातून भाऊंना दर महिना तीन रुपये मदत मिळत असे. गेले तीन महिने ती आली नव्हती. त्यामुळे भाऊ अगदी हवालदिल होऊन गेले होते. पैशावाचून गुन्डूची परीक्षा बुडू नये म्हणून देवाची सारखी आळवणी करीत होते. इतक्यात तीन महिन्यांची नऊ रुपयांची मुंबईहून मनीऑर्डर आली. ती हाती पडताच ते नऊ रुपये घेऊन भाऊंनी सावंतवाडीची वाट धरली. गुंडूच्या आईने गुंडूसाठी काही गोडधोड करून दिले. त्याचे बोचके डोक्यावर घेऊन भाऊ पायी निघाले, ते सावंतवाडीच्या मोटारस्टँडवर हताश होऊन बसलेल्या गुंडूला अगदी वेळेवर भेटले. गुन्डूच्या उतारासाठी व मालवणातील वास्तव्यासाठी भाऊंनी ते नऊ रुपये गुन्डूला दिले. त्या लाख मोलाच्या नऊ रुपयांमुळे आणि भाऊंच्या आशीर्वादाने गुन्डू मराठी फायनल परीक्षेत उत्तम रीतीने यशस्वी झाला.

गुन्डूचे वडील फटू (आप्पा) चरितार्थासाठी बराच काळ गोव्यात राहिले. त्याना संसारात स्थिरता लाभली नाही. अनेक ठिकाणी भटकंती करूनही दारिद्रय त्यांची सोबत करीत राहिले. तरीही गुन्डूला इंग्रजी शिक्षण देण्याची त्यांना मोठी उमेद होती. सावंतवाडीला गुन्डूने तीनचार सोबती बरोबर घेऊन एका खोलीत बिऱ्हाड थाटले. हाताने

जेवण करून ते सर्वजण शाळा करू लागले. फी-पुस्तके वगैरे प्रत्येक बाबतीत गुन्डूला आर्थिक टंचाई आड येत होती. तशाही परिस्थितीत इंग्रजी पाचवीपर्यंत त्याने मजल मारली. पण आपांची आर्थिक स्थिती ह्यावेळेला फारच संकटमय झाली होती. गुन्डूला महिन्याकाठी आठ आणे उचलून देण्याची क्षमता पण त्यांच्यात राहिली नव्हती. शिक्षण सोडून गुन्डूने काही पैसे मिळविल्याशिवाय त्या कुटुम्बाला आता तरणोपाय नव्हता. सावंतवाडीच्या शिक्षण अधिकाऱ्याकडे आपांनी आपली इभ्रत पणाला लावली आणि गुन्डू 'न्हयीच्या आड' गावच्या प्राथमिक शाळेत महिना सात रुपये पगारावर मास्तर झाला. शिक्षण बंद पडल्यामुळे गुन्डूला वाईट वाटत होते. पण संकटाच्या काळात आपण आपल्या कुटुम्बाला हातभार लावू शकतो, ह्या गोष्टीने त्याला पराकाष्ठेचा आनंद झाला. थोडयाच अवधीत 'न्हयीच्या आड' गावच्या शाळेत गुन्डू एक विद्यार्थिप्रिय शिक्षक बनला.

गुन्डूने आपले लेखन आणि वाचन चालू ठेवले. शिक्षक असताना ट्रेनिंगसाठी त्याला बेळगावला जावे लागले. तेथेही एका भाडयाच्या खोलीत त्याने बिऱ्हाड थाटले. तीन गावाहून आलेले तीन मास्तर त्यांत भागीदार होते. त्यात एक ब्राह्मण (भट), दुसरा गुन्डू (बामण) व तिसरा मराठा होता. या तिघांचा संसार अत्यंत खेळीमेळीने चालून गुन्डूने यथाकाल ट्रेनिंग पूर्ण केले. त्यानंतर काही दिवसांनी सावंतवाडी शिक्षणखाते सोडून त्याने मुम्बईस शिक्षकाची नोकरी धरली. काही काळ त्याने तीन वर्षे एक छोटेसे वर्तमानपत्रही चालविले. श्रीमती राधाबाई तुकाराम देसाई गुंडूची आत्या लागत होती. तिने भाई जीवनजी लेनमधील आपल्या राहत्या घरात गुंडूला एक लहानशी खोली दिली. त्या खोलीमुळे मुंबईत गुंडूचा पाय स्थिर झाला. शिक्षकी सांभाळून गुंडूने लेखनकार्य चालू ठेवले. १९५५ पर्यंत आजगाव-दर्शन, वालावल-दर्शन, व कुडाळदेशकर खंड एक ते तीन, इतके ग्रंथ त्याने प्रकाशित केले. त्यात आर्थिक प्राप्ती काही झाली नाही. शिक्षकीचे वेतन हेच गुंडूमास्तरांचे एकमेव अर्थसाधन होते. त्यातून गावी कुटुंबाला मदत करून जे काही उरेल त्यावरच त्यांची स्वतःची गुजराण होत होती.

मास्तरांचे वय आता छत्तिशीच्या आतबाहेर होते. तरीही मास्तर अविवाहित होते. आपल्या आवडत्या व्यवसायात गुंग असल्यामुळे की काय लग्न करून संसारात पडण्याचा विचार त्यांना शिवला नाही. मास्तरांचे एक दूरचे नातेवाईक आबा राळकर, राधाबाईंच्या घरांत पोटमाळ्यावर बिऱ्हाड करून होते. त्यांची मॅट्रिक झालेली मुलगी मनोरमा नगरपालिकेत शिक्षिका होती. मास्तरांच्या साहित्यकार्याचा तिला परिचय झाला होता. मास्तरांची त्यागी वृत्ती व सामाजिक कार्याची आवड याबद्दल तिला फार कौतुक वाटे. मास्तरांच्या गुणांनी ती त्यांच्याकडे आकर्षित झाली. उत्तरोत्तर त्या दोघांचा स्नेह वाढत गला. स्नेहाचे रूपांतर प्रेमात झाले. त्या दोघांच्या वयामध्ये बरेच अंतर होते. पण ते त्या दोघांचा विवाह होण्यास आड आले नाही. आणि कुमारी मनोरमा सौ. विनया नाव धारण करून मास्तरांची सहधर्मचारिणी झाली. परिस्थितीमुळ संसाराविषयी उदासीन बनलेल्या मास्तरांना अशा तऱ्हेने संसारात आणण्याचे श्रेय विनयाताईलाच आहे. मास्तर–विनया दांपत्याला दोन मुलगे व एक मुलगी एवढी संतती लाभली आहे. मास्तरांना आपली शिक्षकी अर्ध्यावर सोडावी लागली असली तरी सौ. विनयाताई आज महापालिकेच्या शिक्षणखात्यात एक आदर्श शिक्षिका म्हणून काम करीत आहेत. त्यांची तीनही मुले कॉलेज-शिक्षण घेत आहेत.

एक मास्तरकी सोडली तर मास्तरांच्या व्यवधानात आज प्रचंड वाढ झाली आहे. मुम्बईच्या ॲल्युमिनियम बाजारात व्यापारी लोक मास्तरांना तुकारामशेट या नावाने ओळखतात. मुम्बई मराठी साहित्य संघ, कोकण मराठी डायलेक्टस संस्था, गौड ब्राह्मण सभा अशा अनेक सार्वजनिक संस्थांशी त्यांचा अगदी निकटचा संबंध आहे. आज मास्तर साठीच्या घरात आहेत. १९७९ च्या मार्च मध्ये मास्तरांची मातोश्री पंचाऐंशी वर्षांची होऊन गेली. त्या माऊलीने अत्यंत प्रतिकूल परि-स्थितीत, कोंड्याचा मांडा करून पूर्वाश्रमात मास्तरांना सांभाळले. ती मास्तरांना पैशाचे धन देऊ शकली नाही. पण उत्तम प्रतीचे संस्कारधन तिने त्यांना उदंड दिले. तिच्याविषयी बोलताना

मास्तर सद्गदित होऊन म्हणतात, 'माझ्या आईची पुण्याई पाठीशी असल्यामुळे मी जीवनात तग धरू शकलो.' माझ्या उत्तर आयुष्यात ऋणानुबंधाने मास्तरांची आणि माझी गाठ पडली. यदृच्छया ती दृढ झाली. मास्तरांच्यातील अस्वादक वृत्तीचा मला चांगलाच लाभ झाला. माझ्याकडून जे काही लेखनकार्य झाले, त्याचा कर्ताकरविता मास्तरच आहेत. मास्तरांच्या एकूण जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकल्यास त्यांचे कुटुम्बीय महाराष्ट्रभाषाभूषण ज. र. आजगावकर यांची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. अंगात हुशारी असूनही प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे ज. र. आजगावकरांना कोणतीही पदवी संपादन करता आली नव्हती. पण त्या त्रुटीमुळेच की काय त्यांच्या उपजत गुणांना चालना मिळून शेवटी ते पूर्णार्थाने महाराष्ट्र भाषाभूषण ठरले! तद्वतच अंगात गुण असूनही केवळ परिस्थितीमुळे आजगावकर मास्तरांना विद्यापीठपदवी संपादन करता आली नाही. तथापी त्या उपजत गुणांच्या जोरावर जीवनाच्या विविध क्षेत्रात असामान्य कर्तबगारी गाजवून 'मास्तर' ह्या उपाधीलाच त्यांनी एका आगळ्या पदवीची प्रतिष्ठा मिळवून दिली आहे !

●

# दाड साखळ

**शेकडो** वर्षामागे उत्तर भारतातून दक्षिण कोकणात स्थलांतर करणाऱ्या गौड ब्राह्मणांनी तेथील सागरकिनाऱ्यावर अनेक गावे वसविली. त्यांच्या त्यावेळच्या 'मूळ भुंकेच्या' (भूमिकेच्या) गावापैकी खानोली हा एक प्रमुख गाव आहे. खानोलीची भौगोलिक रचना एखाद्या औरस चौरस टेबलासारखी आहे. टेबलाचा पृष्ठभाग, ज्याच्यावर करडाची काडीसुद्धा रुजत नाही असे शुद्ध कातळ (काप) आहे त्यामुळे गावांची वस्ती चोहोबाजूच्या उतारावर विखुरलेली आहे. वेतुरे गावाच्या सीमेलगत एका कोपऱ्यात गावाचे श्रीसिद्धेश्वर रवळनाथादि पंचायतन-

देवस्थान वसले आहे. या देवस्थानात खानोली गावातील सर्व देवदेवतांचे एकत्रीकरण करण्यात आलेले आहे. त्यामुळे गावाच्या सर्व स्तरांतील जनतेला एकात्मक श्रद्धास्थान उपलब्ध होऊन गाव एकसंघ राहिला. शेकडो वर्षांपूर्वी आमच्या ज्या द्रष्टया पूर्वजाने ही कल्पक एकात्मकता साधली त्याची जिवंत समाधी श्रीसिद्धेश्वराच्या सभामंडपात आहे. 'समाधीपुरुष' ह्या उपाधी व्यतिरिक्त आम्हाला त्या महापुरुषाची ओळख नाही. पण त्याने निर्माण केलेल्या या अपूर्व देवस्थानात सन १९८५ च्या फेब्रुवारी महिन्यात ताजा इतिहास घडला.

खानोली देवस्थानचा कारभार गावकऱ्यांच्या व्यवस्थापक कमिटी-कडून केला जातो. व्यवस्थापकांपैकी एक श्री. कृष्णाजी वामन तथा आना प्रभूखानोलकर यांच्या जिद्दीच्या अचूक मार्गदर्शनामुळे गेल्या दसकडीत देवस्थानात अनेक नेत्रदीपक सुधारणा झाल्या आहेत. देवस्थान अतिप्राचीन असल्यामुळे अनेक देवळांचा जीर्णोध्दार करावा लागला. प्रतिवर्षी महाशिवरात्रेला श्रीदेवरवळनाथाच्या रथोत्सवासाठी तात्पुरता पण मोठा मंडप उभारावा लागे. दरवर्षी मंडप बांधण्याचे ते काम कालपरत्वे फारच कठीण होऊ लागले. आनांच्या मनात काय आले कोणास ठाऊक. रथोत्सवासाठी कायम स्वरूपाचा सिमेंट काँक्रीटचा मंडप बांधण्याचा धाडशी संकल्प त्यानी सोडला ! आणि विश्वास ठेवा अगर ठेवू नका आनांचा तो संकल्प सिध्दीस गेला. जिच्या बांधणीला आजच्या हिशोबाने अडीच लाखांवर खर्च येईल अशी रथोत्सव मंडपाची भव्य, प्रशस्त आणि नेत्रदिपक वास्तु आज उभी राहिली आहे. अशी अनेक कामे झाली, देवस्थान क्षेत्रात अनेक कुशल आणि अकुशल कारागीर वावरले. त्यांच्या हत्यारांचे देवस्थान भूमिकेत अनेक ठिकाणी आघात झाले. मोडतोड झाली. आदळआपट झाली. तर काही विशेष शास्त्रविधी करून देवस्थान भूमिका वातावरणाचे शुध्दी-करण करावे असा विचार आनांच्या मनात आला.

आनांचा विचार सहकाऱ्यांनी उचलून धरला. मुख्य अडचण होती ती खर्चासाठी लागणाऱ्या द्रव्याची. रिवाजाप्रमाणे रवळनाथाला कौल लावला. देवाने अतिउत्तम प्रसाद दिला. व्यवस्थापकांनी योजना आखली

आणि त्यानुसार शुक्रवार दि. ८-२-८५ रोजी एका ऐतसासिक वैदिक समारोहाचा शुभारंभ झाला. माघी संकष्टीचा तो दिवस. सकाळीच प्रोक्षणविधी झाल्यानंतर श्रीसिध्देश्वराच्या देवळांत श्रीगणेशाच्या छानदार मूर्तीची प्राणपतिष्ठा करण्यात आली. गणपतीस अथर्वशीर्ष-सहस्रावर्तनादि उपचार झाल्यावर गणेशयागाला सुरुवात झाली. त्यानंतर प्रतिदिनी क्रमाने महारुद्र, रुद्रस्वाहाकार, नवचंडीपाठपठण, नवचंडी होमहवन, सामुदायिक सत्यअंबा महापूजन आणि सातवे दिवशी सांगता समाराधना (गावभोजन) असा तडाखेबंद कार्यक्रम झाला. ध्वनि-क्षेपकांची योजना असल्यामुळे ब्राह्मणांचा वेदमंत्रघोष आसमंतात दूरवर ऐकू येण्याची सोय झाली. समारोह सप्ताहाच्या सर्व दिवशी सायंकाळ-पासून पहाटेपर्यंत प्रवचन, भजन, कीर्तन, गायन, नृत्य, दशावतारी-नाटच इत्यादीमुळे देवस्थानचा परिसर गाजून राहिला होता.

समाराधनेच्या दिवशी दुपारी एक वाजल्यापासून भोजनास सुरवात झाली. तर रात्रौ नऊ वाजेपर्यंत लोक जेवतच होते. असंख्य जन जेवून तृप्त झाले. किती लोक जेवले त्याची मोजमाप कोणी कशाला करावी ? त्या ठिकाणी साक्षात् जनताजनार्दनच आपल्या अनंत तोंडांनी जेवीत होता. त्या अनंत तोंडांना तोच अनंतहस्ते वाढीत होता. त्याचेच अनंत हस्त लागेल ते साहित्य जमवीत होते. तेच अनंत हस्त अन्न शिजवीत होते. मग अशा समयी कोणत्याही गोष्टींचा तुटवडा कसा पडावा ? रवळनाथाने उत्तम प्रसाद देऊन खर्चाची जबाबदारी स्वतःवर घेतली होती. त्यामुळेच की काय कार्यानिमित्त भाविक जनांकडून येणाऱ्या देणग्यांचा सारखा ओघ लागला होता. आजकाल अशा कार्याला खरी अडचण असते ती योग्य ब्राह्मण मिळण्याची. पण खानोली देव-स्थानची गोष्टच निराळी. सर्व धर्मविधी शास्त्रोक्त यथासांग व्हावेत म्हणून तीस-पस्तीस विद्वान् अधिकारी ब्राह्मण देवस्थानच्या अतिथी गृहात दहा दिवस मुक्कामच ठेवून होते ! सात दिवसांच्या या अपूर्व धर्मसोहळयाने खानोली देवस्थान एक धर्मक्षेत्रच झाले आहे. रवळ-नाथाच्या कृपेने या सोहळयात सहभागी संधी मला लाभली.

मी आठ नऊ वर्षांचा असताना माझा चुलत बंधू श्रीकृष्ण

(अण्णा) याचे लग्न गावाला घरी झाले. लग्न, मुंज इत्यादि कार्य झाल्यावर संबंधितानी गावच्या देवास जाण्याची प्रथा होती. अजूनही ती आहे. तर अण्णाला देवास जावयाचे होते. मीही त्याच्याबरोबर जाण्याची तयारी केली. आम्ही निघालो तेव्हा माझे वडील नाना (कै. गजानन आत्माराम नाईक) म्हणाले, 'अरेऽ देवळाकडे जाताहास तर थंयसरच दाड साखळ आसा त्येच्या पाया पडान् येवाऽ.' आम्ही देवळाकडे गेलो. रीतीप्रमाणे सर्व देवळात नारळ ठेवणे, पाया पडणे, वृत्तिकांनी गाऱ्हाणे घालणे वगैरे सर्वकाही यथासांग झाले पण नानांच्या सांगण्याप्रमाणे तेथेच असणारा दाड साखळ मात्र आम्हाला गवसला नाही! चार मैल काप पायी तुडवीत देवळाकडे गेलो आणि दाडसाखळ भेटला नाही म्हणून मी फार नाराज झालो. दाड साखळ कोण आणि त्याच्या पाया का पडायचे याचाही नीटसा बोध झाला नव्हता. त्यानंतर केव्हातरी प्रसंगोपात्त देव-देवस्की विषयी बोलताना नानांनीच मला ती कथा सांगितली.

निसर्गसंपत्ती-सौंदर्याच्या बाबतीत खानोली गांव समृद्ध आहे. तपस्व्यांना साधनेसाठी योग्य नितांत रमणीय, केवळ दर्शनानेच विकारी पुरुषाला विरक्त बनविणारी अशी चारदोन प्रशांत स्थानेही या गावी आहेत. श्रीसिध्देश्वराच्या देवळापासून पन्नास पावलांवर फार उंच नाही आणि फार तोकडाही नाही असा एक डोंगर आहे. सुमारे दोनशे वर्षापूर्वी या गावी एक तपी साधना करीत होता. त्याचे नाव काय, गाव काय, आईवडील कोण, कशाचा कशाचाही कोणाला पत्ता लागला नाही. पांढरीशुभ्र लांब दाढी आणि गळ्यात भली मोठी साखळी अशी त्याची नजरेत भरणारी दोन वैशिष्टये होती. त्यामुळेच त्या अनामिक साधकाला लोकानी 'दाडसाखळ' ही उपाधी बहाल केली. दाडसाखळाच्या कालानंतर त्या डोंगराला दाडसाखळ हेच नांव पडले आहे. आम्हा वायंगणीच्या नाईकांचा एक पूर्वज काळ नाईक दाडसाखळाचा समकालीन होता. तो दाडसाखळाचा चहाता असून त्याला गुरुस्थानी मानीत असे. ह्या पूर्वसंबंधामुळे दाडसाखळ आम्हाला वंदनीय झाला आहे.

लहानपणी दाडसाखळ पहाण्याची संधी झुकली. ती तव्वल साठ वर्षांचा काळ लोटल्यावर फेब्रुवारी १९८५ मध्ये पुन्हा प्राप्त झाली. खानोली देवस्थानचा कारभार गावकारांच्या व्यवस्थापक कमिटीकडून होतो हा उल्लेख मागे आलाच आहे. देवस्थान गावाच्या एका कोपऱ्यात आणि गांवकार मंडळी त्यापासून दूरदूरच्या कोपऱ्यात वसत असल्यामुळे त्याना देवस्थानकडे नित्य लक्ष्य देणे अशक्य होते. ह्याला श्री दामोदर भिकाजी तथा दामूअण्णा प्रभूखानोलकर हे एकच गावकार अपवाद आहेत. दामूअण्णा देवस्थाननजीक असलेल्या दाडसाखळावरच रहातात. दाडसाखळाचा डोंगर त्यांचे वतन आहे. तेथेच त्यांचे वडिलोपार्जित घर आहे. त्या घराची आणि वतनाची त्यानी अप्रतिम व्यवस्था ठेविली आहे. ते देवस्थानजवळ रहातात पण गांवकारांच्या समितीत कधीही रहात नाहीत. तरीही देवस्थानक्षेत्राची काळजीपूर्वक देखभाल करण्याचे काम ते आवर्जून करतात. मोबदल्याची कसलीही अपेक्षा न ठेवता देवस्थानच्या कामात व्यवस्थापकाना ते आपणहून यथाशक्ती मदत करीत असतात. फेब्रुवारीच्या 'बहुकालमपर्वणी' धर्मोत्सवांत तर सर्व कामात ते अग्रभागी वावरत होते. त्यानीच मला आवर्जून दाडसाखळावर नेले आणि त्या स्थानाचे दर्शन घडविले. त्या दर्शनी दाडसाखळ नेमका ह्या दुर्गम स्थानी का वसला ह्याचा उलगडा झाला.

ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायात साधकाना अनुष्ठानासाठी आवश्यक असणाऱ्या स्थानाची लक्षणे दिलेली आहेत. ती सर्व दाडसाखळडोंगरावर आहेत. ज्ञानेश्वर सांगतात : ।। आणिकही एक पहावें । जें साधकें वसवें द्वोवावे । आणि जनाचेनी पायरवें । मैळे चिना ।।७२।। जेथ अमृताचेनी पाडें । मुकेहीसकट गोडें । जोडती दाटें झाडें । सदा फळतीं ।।७३।। पाउला पाउला उदकें । परि वर्षाकाळींही चोखें । निर्झरें कां विशेखें । सुलभे जेथ ।।७४।। हा आतपुही अळुमाळु । जाणिजे तरी शीतळु । पवनु आणि निश्चळु । मंद झुळके ।।७५।। बहुतकरूनी निःशब्द । दाट न रिगे श्वापद । शुक हन षट्पद । तेउते नाहीं ।।७६।। पाणिलगे हंसे । दोनी चारी सारसें । कवणे एक बैसे । तरी कोकिळही हो ।।७७।। निरंतर नाहीं । तरी आलीं गेली कांहीं । होतु कां मयुरेही । आम्ही ना न म्हणों ।।

दाडसाखळाच्या जागयावर त्याच्या पूर्वीही कोणी साधक निश्चितच बसला असणार. पण सामान्य जनांच्या पायांनी येथील दाट पाचोळाही कधी' ढवळला गेलेला नाही. दामूअण्णांचे एकच घर या स्थानाला निकटवर्ती आहे. तथापि स्वतः दामूअण्णांनी अगर त्यांच्या कुटुंबियानी तेथे कधी ढवळाढवळ केलेली नाही. येथे सदा फळणारी व गोड मुळे असणारी झाडे विपुल आहेत. डोंगरात निर्मळ पाण्याचे झरे आहेत. इतकेच काय बारमाही अती स्वच्छ आणि गोड पाण्याने भरलेली एक तळीही! (लहान तळे) आहे. त्या तळीत नीलकमले उमललेली आहेत. त्या तळीतील नीलकमले दामूअण्णा प्रतिदिनी श्रीसिद्धेश्वराला वाहतात. दोन प्रहराच्या भर उन्हात तापून दामूअण्णाबरोबर मी त्या जागी पोचताक्षणींच एखाद्या वातानुकूलित गृहात प्रवेशल्यासारखे मला वाटले. सूर्य माथ्यावर होता तरी अती शीतळ वाटत होता. वारा पडला होता तरी त्याच्या मंदमंद झुळका येत होत्या. शांततेचा भंग करणारा कसलाही अनैसर्गिक आवाज तेथे नव्हता. श्वापदांची विष्ठा त्या भागात कधी पडली नाही. तेथे राघू आणि भ्रमर तर औषधालाही नाहीत. हंस आणि सारस इकडील भागात आढळत नाहीत. कोकिळ मात्र आहे. येऊन जाऊन असणारे मोर येथे आहेत आणि विशेष म्हणजे दामूअण्णांच्या अंगणात मयूर आणि मयूरीचे एक जोडपेही पाळलेले आहे !

अशा स्थानांची महानता सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात : जया आड जाता पार्था । तपश्चर्या मनोरथा । पाखंडियाही आस्था । समूळ होय ।।६७।। स्वभावे वाटे येतां । जरी वरपडा जाहला अवचितां । तरी सकामुही परि माघौता । रिघों विसरे ।।६८।। ऐसे न राहतयाते राहावी । भ्रमतयातें बैसवी । थापटूनि चेववी । विरक्तीतें ।।६९।। हें राज्य वर सांडिजे । मग निवांता एथेंची असिजे । ऐसे शृंगारियांहि उपजे । देखत खेवो ।।७०।। जें येणे मानें बरवंट । आणि तैसेंचि अति चोखट । जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ।। ज्ञानेश्वरांनी सांगितले स्थान माहात्म्य अलौकिक आहे. माणूस विकारांनी पेटलेला जरी असला आणि अवचित अशा स्थानी आला तर तो तात्काळ विरक्त बनतो इतकेच नव्हे तर तो मागे न फिरता पुढील साधनेसाठी तेथेच बसती

करतो. सकाम आणि विकारी माणसांची जर ही कथा तर पूर्वील अध्यात्मिक तयारी असलेला एखादा साधक अवचित अशा ठिकाणी आला तर तो माघारी जाणार नाही यात काय संशय ? दाडसाखळ पूर्वी सकाम होता किंवा निष्काम होता ह्याची माहिती नाही. तथापि अवचित तो त्या खानोलीच्या डोंगरात आला आणि त्या स्थानाच्या माहात्म्याने भारला जाऊन ' माघौता निघों ' विसरला !

दाडसाखळाने आपल्या येथील वास्तव्यात काही चमत्कारादी प्रकार केल्याचे ऐकिवात नाही. देहधारी असल्यामुळे त्याने आपल्या देहाचे केव्हातरी विसर्जन करणे भाग होते. तथापि तो समाधिस्थ झाला, की तुकारामाप्रमाणे गुप्त झाला की सर्वसामान्याप्रमाणे मृत्यू पावला ह्याबद्दल निश्चित माहिती सोडाच, पण एखादी दंतकथाही प्रचलित नाही. त्याच्या वसतीच्या जागी त्याचा देहांत दाखविणारी एखादी खूणही नाही. तथापि त्या जागी आजमितीस एक प्रचंड वृक्ष उभा आहे. जमिनीपासून पंचवीस तीस फूट सरळसोट वाढलेल्या ह्या वृक्षाचा चार पाच फुटांचा गरगरीत वाटोळा घेर आहे. पंचवीस फुटांवर चोहोबाजूना फैलावणाऱ्या दाट फांद्यांचा पसारा आहे. त्याच्याहीवर हिरव्यागार पानांनी गच्च भरलेला शेंडा आहे. या वृक्षाच्या मुळांचा प्रकार काही अजबच आहे. मुळे जमिनीत आहेतच. पण तीच मुळे जमिनीवरसुद्धा दृश्यमान झालेली आहेत. एका मुळाने तर वृक्षाच्या बुडापासून दहाबारा फूट लांब आणि फूट सव्वाफूट उंच अशी भिंतच बनविलेली आहे.

दाडसाखळाप्रमाणे हा वृक्षही अनामिकच आहे. त्याच्या जातीचे वृक्ष दुसरीकडे कुठे आहेत किंवा काय हा एक संशोधनाचा विषय होईल. दाडसाखळाने जेव्हा केव्हा आपल्या देहाचे विसर्जन केले त्या वेळेला हा वृक्ष लहान रोपटा असावा. त्या रोपट्याची अशी प्रचंड आणि चमत्कृतीजन्य वाढ कशामुळे झाली ? दाडसाखळासारख्या योग्याच्या सहवासाने त्या वृक्षामध्येही काही अलौकिक शक्ती संचारली की काय ? ते कसेही असो, आज त्याच्याकडे बघणाऱ्याला तो समाधी अवस्थेत स्तब्ध असणाऱ्या एखाद्या योग्यासारखाच वाटतो !

●

# गजालीन् घोव खाल्लो !

(सादेव अण्णा : पन्नाशीचे पांढरपेशे गृहस्थ. हाडाचे कामचुकार, गोष्टीवेल्हाळ, पान खाण्याच्या बाबतीत चोखंदळ. घरात फक्त त्यांची प्रौढ मुलगी बायो वावरत आहे. सायंकाळी साडेचारचा सुमार. सादेव अण्णा नुकतेच खालच्या आगरातून थकून आले आहेत. पान खाण्यासाठी नेहमीच्या जाग्यावर चंची शोधतात. चंची सापडत नसल्यामुळे आपल्या मुलीला, बायोला हाका मारतात.)

सादेव अण्णा : अगदी फावणा नायऽऽ. तोंडात पान टाकीन म्हटलंय तर फावणाऽ नाऽऽय. (चंची शोधीत) असा काय ह्या ? माजी चंची खय गेली ? बायाऽऽ गोऽऽ बाया. आसा काय नायऽ ह्या घरात ? मी हंयसर जीव टाकूक इलय आणि ह्या गेला हा तरी खयऽ ? (जोराने) बायग्याऽऽ ! (दरवाजाजवळ बायोची आकृती दिसते.) अगोऽ, होतस खय तू ? गोऽऽ इतको मी आराडलयऽऽ, तर तुजी ओ सुद्धा येयना !

बायो : असा काय करतास् अण्णाऽ ? पाट्ल्या दाराक् तांदूळ धुय होतय ! तुमची हाक आयक्लय् आणि तांदूळ आदनात् टाकून ह्या धावान् इलय ! (हात लुगड्यास पुसते.) हातसुद्धा धुलय् नाय !

सादेव अण्णा : अगोऽऽ, माजी चंची बगललय् ? हंयसरच वळकटीखालती ठेवललय्ऽ.

बायो : थंय्सरच अस्तली. जातली खंय् ?

सादेव अण्णा : हां हां गाव्ली. गावलीऽ एकदाची. (चंची बघून) आंऽ ह्यां काय ? अगोऽ, माज्या चंचेक हात कोण लावता ? कोणी सोड्लली माजी चंची ? ह्येतुर येक वस्तु जाग्यार धड नाय् !!

बायो : इतक्या आरडाक् काय जाल्लाऽऽ अण्णा ? ... तुमच्या चंचेक् कोण कदी हात् लावता ?... मगाशी त्या फुल-ग्याच्या चेडवान् हाडली खांव्ची पानाऽऽ तेवा कात् बगुच्यासाटी मीच् जरा घेतललय्ऽऽ !

सादेव अण्णा : अगोऽ कात् घेतलस म्हणान् काय नायऽऽ तुका कात घेव् नको म्हणणय नाय् मीऽऽ पण मी चंची बांदतय तशी ही नायऽ. माजी चंची कोणाक दुसऱ्याक बांदाक येवचीच नायऽऽ आज इतकी वर्सा मी ही चंची सोडतय आणि बांदतय, पण बांदण्यात कदी सुताचो फरक पडाचो नाय ऽऽ दुसऱ्याचो हात लागललो माज्या तेवाच लक्षात येताऽ (रस्त्याकडे बारीक डोळ्यानी बघत) अगोऽ बायोऽऽ

बायो : काय म्हणास अण्णा ?

अण्णा : तो हयॅच्यासारको कोण जाताहा गो तोऽ ?

बायो : कोणासारको कोण म्हणताहास अण्णा ? माज्या नाऽय बाये येणाहा लक्ष्यात

अण्णा : चिटक्याचो बाबलो न्हय काय गोऽ तो ?

बायो : होय होऽ होय अण्णा ! बाबलोच होऽ तो ॥ निसतो धावताहा अगदी वाग पाटिक लागल्यासारकोऽ.

अण्णा : (हाका मारतात) अरे येऽऽ बाबल्याऽ (बाबल्या धावता धावता बोलतो )

बाबल्या : फटकी रे येवऽ. हैकऽ हैकऽ.

अण्णा : रेऽऽ, फटकेक कोणाक घाल्तऽ ?

बाबल्या : तुमका न्हय. तुमका न्हय.

अण्णा : बाबल्याऽ जरा असो येऽ

बाबल्या : आता नाय, आता नायऽऽ मगेऽ येतयऽ बैलाक सोडलंय.

अण्णा : अरेऽ काय काम नाय सांगणयऽ पान खाव्न जा. पान खाव्न जाऽ बास जराऽ.

बाबलो : (सादेवअण्णाच्या चोफाळ्याजवळ येत खाली बसतो.) अन्नानु, आता नाय गावाचा बसाक्. ह्याऽ तुमी पान

देतय म्हटलास ता घेव्न घाव मारूक व्हयीऽऽ बैलांक सोडलहयऽऽ बासग्यान् केलाहा मिरशांगाचा परडा. तेच्या मेरेर आमा इल्ली चाऽर. वायच पॉट भरतले ! पन वशाड हिरव्या बगून कुडनाभितूर घालून घेतीत म्हणान् भय दिसताऽऽ.

बायो : कायय म्हणाऽ, बाबल्याचे बैल पण बैल आऽसत् हां अण्णाऽ कसो जपता तेकाऽ. आतासा हिरव्या नायऽ तर सगळा इनाचा रान तुडौन् पाला आणतलो तेंच्यासाठीऽ कायय म्हणाऽ, बाबल्याक गोरवांची मायाच आसा हांऽऽ.

बाबलो : (खूष होऊन) मोन् जात हा ती बायोऽऽ. तेंका सांगाक येना नाय. तेंका आमी आदी बगूक व्हया. आरता परता करूचा लागता. तरास जाता. पन् तेंका पातेयऽ सारक्या नाऽऽय.

बाबलो : कोनाचा कुडान् पेचतीत काय करतीत. आरड घेव्न येतीत. तर काय म्हणयऽऽ... त्यांका बगुचा लागताऽऽ.

अण्णा : ह्या धर पान. बस जराऽऽ, जाशीत... खंय नाय जाणहत मसणात तुजे बैल. माजो पण आसा आज पेरो. बाबड्या वाडवडलांनी तळी बांदान आपौणी पाणी हाडला ...निसता परतला काय आगरा भिजान थंडगार रौतत.

बाबलो : रौतत तरऽऽ. वाडवडलांची गजाल कित्याक बोलांक व्हयीऽऽ केदे पुरूस तेऽ ? आनि खडपा फोडल्याहानी ती काय अशी तशीऽऽ ?... आता हरन फुटली तर गुंडो लांव्क आम्का फावना नायऽ. तेनी केल्यानी म्हणान आमी खातव्ऽ (तोंडात पान टाकतो.)

अण्णा : सांगतय ता काय ?... फावणाच नाय रे अगदी. हरण बगून इलऽय आणि हीं चंची सोडतहऽय इतकोच. तू दिसलस् ...पान खाव्न, वांगडान जावया म्हणान हाक मारलय. हरण बगूक व्हयी परत. सक्यारो अडकात, पतारो अडकात, सोन्यासारक्या पाणी फुटान जायतऽ. माज्या फाटसून आसा शिवग्या म्हापणकराचो पेरो.

बाबलो : अन्नानुऽ, शिवग्यान् चुंगटांग का काय तरी भाताचा बियाणा पैदा केलाहाऽ, तां काय ?

अण्णा : अरेऽ, चुंगटांग न्हय बाबल्या. टायचुंग म्हणतत तेका. जपानी भाताची जात आसा ती. शिवग्यान् नमुन्याक म्हणान एक वाफो केलोहा त्येचो. तेका पाणी खूप लागता.

बाबलो : शिवग्याक फावता तरी कसा कायतरी नयी नयी खुळा काडूक ?

अण्णा : खूळ न्हय तां बाबल्या. शिवगो हाडाचो उद्योगी आसा. आपण बरो आणि आपलो उद्योग बरो. कोणाच्या गजालीक कद्दी अुब्रो रवाचो नाय्ऽ. पान खाव्क बस म्हटला तर बसाचो नाऽय. म्हणान तेका फावता.

बाबलो : (पिचकारी टाकण्यासाठी बाजूला जातो) अन्नानुऽ

अण्णा : काय म्हणस बाबल्या ?

बाबलो : ह्यसरलो माड काय जालोऽ ?

अण्णा : अरेऽऽ, तो तोडूचो लागलोऽ. जोवार इल्लाऽ अगदी. पण करतलस काय ? वादळात घरार केवा कोसळान् पडात तेचो नेम नाय होतो !

बाबलो : कसो ताडासारको वाडललो नाऽऽय ?

अण्णा : अरे ग्रेदोसो कवातो होतो तो. देवक्या म्हशीन् चुडता खाव्नखाव्न त्येची वाट लावलली,... पण गेल्या चार वर्सात एकदम वाडलो.

बाबलो : भाऊनी लायललो कवातो तोऽ माका ठाव्क आसा. माज्या अगदी लक्ष्यात आसा. भाऊनी पायाची कुदळ ह्यसर मारली आनि...

बायो : काय तरी काय सांगतस रे बाबल्या ? भाऊ कुदळ कित्याक मारतले ? खंय्चा खंयतरी सांगतलो.

बाबलो : तुका नाय ठाव्क बायो. तुजो जलम् जाव्च्या आदी खूप वर्सांची गजाल. भाऊ हंयसर इलेऽ तेवा काय होता हंयसर !!

अण्णा : मसनवट व्हती ही !

बाबलो : आतांऽ कसा ? भर बारा वाजांक हंयसर भुतांची हुयेल आयकाक् येयऽ... पन् भाऊनी घार बांदाच्यासाठी हीच जागा पास केली. पायाची पयली कुदळ हंयसर मारल्यानी आनि थंयसर तो कवातो लायल्यानी. माका काय ठाव्क नायऽऽ ?

अण्णा : पण बाबल्याऽ, तुका ठाव्क नाय्ऽ. तो कवातो मीच हाडलल्य्ऽ. मी न्हान् होतय तेवा. तसो न्हान् नायऽरे सतराअठरा वर्सांचो होतय. शाळेत जाय्. वाटेऽर श्रीधर आनांचा घार तेंच्या खळयांत खूप कवाते असाचे तेतुरलो आनानी एक नमुन्याक माका दिल्यानी. तो तो कवातो.

बाबलो : सांगतास तरी काय अन्नानुऽ ? शीरीदर आना कोन ? नाय बा लक्ष्यात येना.

अण्णा : अरे श्रीधरआना तुका ठाव्क नायऽ बाबल्या ? अरे ते येळेवरचे श्रीधर आना ! !

बाबलो : येळेवयले आनाऽऽ ?असा सांगाऽ. माडचेचा घार असाऽ त्येंचा. माका काय ठाव्क नायऽ? पन अन्नानुऽ त्येंचा तुमचा काय इतक्या ह्यांऽऽ ?

अण्णा : अरे, मी न्हान असल्यापासून माजार त्येंचो भारी लोभ. ही काठीच बघीनस्. श्रीधरआनानीच माका भ्याट दिली.

बायो : कायतरी काय सांगतास अण्णा ? बाबल्याऽ तूच बग रे. आनानी दिल्लली काठी अजून रौलीहांऽ ? ती केव्राच मोडान गेली.

बाबलो : काटी तरी कसली व्हती ती मोडान् जाव्क ?

बायो : होती रे बरी ऐनाची. पण अण्णानी ती भदग्या न्हावयाच्या ह्याच्यार मारल्यानी.

बाबलो : आँ ? न्हावयार अन्नानी काटी कित्याक घातली ?

अण्णा : तेचा काय ऐकतस बाबल्याऽ ?

बायो : मी काय खोटा सांगतऽय ? भदग्याचो रेडो आंगार इलो अण्णाच्या (हुंदका देते.) त्येच्यार अण्णानी ती काटी घातली. रेडो जागचो हल्लो नाय् पण काठयेचे तुकडे जाले.

बाबलो : सांगतस तरी काय बायो ?

बायो : मग गुदस्ताऽ मी त्या रामग्या आसोलकराक सांगान् मांजरीचो ही दुसरी काठीऽ अण्णासाठी आणून घेतलय अण्णाच्या काय लक्ष्यातच रौणा नाय.

अण्णा : आसात्... आसात् गोऽऽ ! माज्या तरी आता कसा रौताला लक्ष्यात ? धा सरली आणि पाच उरली.

बाबलो : अन्नानुऽऽ ! ह्या पडव्येच्या भितोडेची पोपय पडलीऽ का काय ?

बायो : ती एक मोटी गंमतच आसा बग बाबल्या. अण्णा सांगतीत तुका ती गजाल.

बाबलो : काय पन सुरेक पोपय जाललीऽ ! जाला तरी काय तिका मोडान पडांक ? वारो नायऽ वादाळ नायऽ. येक येक पोपय अशीऽ येऽ दीऽ... गोडयेक पन बरी व्हती नाय बायो ?

बायो : न्हाणयेच्या पाणयाचो खाऽत आणि चुलीतली रकाऽ तिका गावलीऽ. तेच्यार ती मातली. शाशंबर पोपय होत्यो वरते. भारान अगदी मोडाक इल्लीऽ. पण काडूक चडता कोण वरतो ?

अण्णा : धा, बारा, पंदरा हाताच्या फुडेऽ वाडललीऽरे माणग्या-सारकी पडवेच्या नळयात शिराकली. बायो तर थारच करीना. कोणायक तरी वरती चडवा म्हणान. पण गावता कोण चडाक ? मगेऽ तो ह्येचो होऽ मोठ्या ह्येणा तेच्यार चडलोऽ ! !

बाबलो : चडलोऽ तरी कोन म्हनतास वरतोऽ ? मोटो काळजा-चोच् आसाक व्हयोऽ ! !

बायो : तां काय इचारू नकोऽ बाबल्याऽ. हुंदरा सारको न्हयरे वरतो चडलोऽऽ. तो वरतों चडाक लागलो मातर आणि अण्णानी (हुंदका देत) जो काय आकांत केलोऽ हाऽ तो काय इचारू नको. !!ऽ

बाबलो : सांगतस तरी काय बायोऽऽ? त्याच येळार अन्नांक काय चावला असो आकांत करूक ?

अण्णा : तेचा काय आयकतस बाबल्या. अरे चावाक कित्याक व्हया ? पोर तो केदोऽ ! ... तो वरतो चडाक् लागलोऽ आणि माझ्या काळजाचा पाणी जालाऽऽ पोपय खतीत एका बाजूक आणि पंचनामो करूची पाळी येयत माज्यार.

बायो : मी पण भियालय हांऽ मनात बाबल्याऽऽ आणि अण्णा इतक्या करतहत तर तू खाली उतार म्हणान म्हणाक लागलयऽ शिरा पडो येवन त्या पोपयांर, रेऽ तूंऽ खाली उतार !

बाबलो : मगे उतारलो मा एकदा खालीऽ? बरा जाला बाये !ऽ पडान मराचो लोकांचो पोर ।।

अण्णा : आयकतस काय बाबल्या, अरेऽ खाली उतराच्या नावान रामा, शिवा गोविंदा ! आणि तो वरतोच जावूक लागलोऽऽ!

बायो : आणि काय सांगाऽ तुकां बाबल्याऽऽ तो कवाळच्यात न्हयरे गेलोऽ.

बाबलो : कवाळच्यात गेलोऽ?

बायो : तो कवाळच्यात गेलो आणि (हुंदका देत) अण्णाक हकडे झींट इलीऽऽ.

बाबलो : गोऽ वगीऽऽ रडा नकोऽ.

बायो : (हुंदके देत) नाय रडणय. पण आठवण इली काय रडाक येताऽ.

अण्णा : मी म्हणय, जळानेत त्यो पोपयऽऽ तू खाली उतार.

बायो : ता याक नाटकच जाला वग बाबल्याऽऽ.

बाबलो : नाटक कसला तेतुर बायो ?

बायो : नाटक नाय तर काय रेऽ, बाबल्या ? तो कवाळच्यात बसान येक येक पोपय काडताहा आणि अण्णा हकडे आरडान जीव घालवतहतऽऽ. तो काय खाली उतरयना आणि अण्णांची आरड काय थांबयनाऽ.

बाबलो : मगे उतारलो. तरी केवा तो ?

बायो : जेवा त्या भाद्दरान शंबर पोपय मोजून काड्लेऽ तेव्वा तो खाली उतारलो !!

अण्णा : पुन्ना परत त्या पोपयर कोणायकय चडौन अपशराण नको म्हणान त्याच पोराकडसून तो हणान घेतलय.

बाबलो : अन्नानूऽ ह्या पोपयचा रामायन जालाऽ. पन रामाची शीता कोन तां खलाच, कोनाचो बा पोर तो इकतो काळजाचो ?

अण्णा : अरे तो सडचावयल्या फोंडकराचो दत्तोऽ. वांदरा सारको चड्ता झाडार.

बाबलो : मुक्त्याचो दत्तोऽऽ ! असांऽ सांगाऽ. आता इला लक्ष्याता आसा खरो पोर मोटो चलाक्. पन अन्नानु; तेका ह्यां· वायच कमीच हांऽऽ.

बायो : बाबल्याऽ, दत्त्याची दुसरीच मोटी गमतीची गजाल आसाऽ अण्णा सांगतीत तुका. हसान हसान अगदी मुडदो पडताऽऽ.

बाबलो : (बैलांची एकदम आठवण येऊन) आता गजाल खांदेत बायो, बैल थकडे वासग्याचा कुडान पेचतीत आनि मगे कोन बाबडो म्हनता तां. तेतुरला जाऽयत. वाऽऽ व्हय गजालीन घोव खाल्लो, तेतुरला जायतऽऽ.

अण्णा : माका जावचा आसा पाणी बगूक. ही चंची बांदतय् आणि वांगडानच जावयाऽऽ. (घराखाली आगरात ओरड ऐकू येते. अन्नानू ओऽऽ अन्नानू घात जालो ओ अन्नानूऽऽ

फुटान गेला ओऽऽ अन्नानूऽ पानीऽऽ) अरे, आरडता कोन थकडे आगरांत ?

बायो : शिवगोसो दिसताऽऽ घात कसलो म्हणताहा ? पाण-याचा काय म्हणताहा ? हरण फुटली का काय ?

अण्णा : (उठत) गजालीन घोव खाल्लो सो दिसताऽ.

शिवा : (धापा टाकीत जवळ येत) अन्नानूऽ अन्नानूऽ मोटो घात जालो.

बायो : अरे जाला तरी काय शिवा ?

शिवा : अगोऽ बांद फुटलो केसग्याच्या मांगरावरतो ! सक्यारो अडकान हरन तुंब्रली आनि बांद फुटलो केसग्याच्या वाकनार.

बाबलो : (काळजीने) माजे बैल नाय मा गमाक शिवग्या ?

शिवा : बाबल्याऽऽ, अरे तू हंयसर. पान खावक बसलय ? मेल्याऽऽ तुझ्या बैलांनी सत्यानास केलो वासग्याच्या मिरशांगांचो.

बाबल्या : शिवग्याऽ, मेल्याऽ मिरशांगात बैल बगलस तर तेंका भायर काडूचे सांडून हकडे आरडत इलस तां काय ?

शिवा : अरे, अन्नांचा पानी खंयसरसा इलाऽ तां बगुचा म्हणान त्या

शिवा : बाजूक येय व्हतय, तर वासग्याच्या परड्यात तुजे वोस् चरतहत !! हांबडूक गेलयऽ तर धावले न्हय रे चंडाळ माज्या आंगार !!

बाबलो : फटकी रे येवऽ

शिवा : काय फटकी ?

बाबलो : तुज्यार न्हय, मेल्याऽ त्या बैलार, वासगो आता माका ठेवचो नायऽऽ. गजालीन शापच घोव खालो माजो. (जातो.)

अण्णा : खयसर म्हटलस फुटलो शिवा, बांद ?... केसग्याच्या वांकणार ?

शिवा : थंयसरच फुटलो ओऽ अन्ना केसग्यांच्या वांकणार आनि पानी गेला सगळा केसग्याच्या मांगरात !

अण्णा : आँ ? (निःश्वास सोडून) मांगरात काय होता नाय म्हणान बराऽ !

शिवा : नाय ओ काय, अन्नाऽऽ सरवाळ्यात तरवो उपांच्या साटी बियांचा भात हाडलल्यान केसग्यान् आजच बाजारसून, मांगरात ठेयलाला तितक्यायला भात भिजान सत्यानास जालो ! !

अण्णा : अरेऽऽ देवा ! केसग्याक ताँड कसा दाखव आता ?

बायो : बगलस मा शिवाऽऽ अण्णांच्या मनाक भारीच लागलाऽऽ कदी म्हणान गजालीक अशे बसणत नायऽऽ. चंची सोडल्यानी आणि हेऽ चोफाळ्यार बसले इकतुकच कदी न्हय तो चिटक्याचो बावलो दिसलोऽऽ. पान खावन जा म्हणान हाक मारल्यानीऽऽ ह्या पान तोंडात टाकतहत तर तुजी आरड आगरात ! !

शिवा : अन्नाचा काय माका सांगाक व्हयाऽऽ बायोऽऽ ! पन गजालीचा वशाड ह्या असाच जाताऽऽ वासगो मिरशांगांक नागावलो आनि केसगो तरव्याक.

बायो : (बसकल मारून) अगेऽ बायेऽ घात जालो. (हुंदका देत)

सर्वजण : अगोऽ रडा नकोऽऽ दगी रव् आता तुजो आणिक कसलो घात जालो ?

बायो : आदनात तांदुळ घातलल्यऽ आता काय करूऽ.

अण्णा : अगो अशी थपकल मारून काय बसलसऽ ? जा बेगिना, बग् जा करपान् कोळसो जालो असात त्या भाताचो. (बायो जाता) हरऽहरऽ आता भायर् तोंड दाखौंक नको आणि सान्चो भात तोंडात घालूक नकोऽऽ शिवाऽ.

शिवा : अन्नानूऽ आता बायोर कित्याक कावतास ? गजालीन सगळ्यांचोच घोव् खाल्लो तेका काय करतलय ?

अण्णा : होय रेऽ बाबा ऽ ऽ गजालीन घोव खाल्ली खरो !

●

# प्राचार्य डॉ. दि. ग. नाईक लिखित ' माझी वाटचाल ' ग्रंथाविषयी काही अभिप्राय व पत्रे.

## महाराष्ट्र टाईम्स १४ डिसेंबर १९७५

**श्रद्धाळू आत्मचरित्र**

आयुष्याची सुरुवात छत्रविना होऊन, संधिकालात सूर्योदय झालेल्या, प्राचार्य नाईक यांची, सतत सुखदुःखाचा, पाठशिवणीचा खेळ खेळणारी आदर्श जीवन-वाटचाल, त्यांच्या ' माझी वाटचाल ' ह्या आत्मचरित्रात त्यानी एका समर्थ लेखकाच्या ताकदीने नि प्रतिभाशैलीने लिहिली आहे.

प्राचार्य नाईक यांनी त्यांच्या गौरवाचे प्रसंग जसे आत्मचरित्रात वर्णिले आहेत, तसेच काहीही आडपडदा न ठेवता त्यांच्यावरील संकटांचे त्यांच्या शारीरिक दुबळेपणाचे, फजितीचे, पराभवांचेही वर्णन केले आहे. नि त्यामुळेच ' माझी वाटचाल ' ह्या आत्मचरित्राला नुसत्या गुण-वर्णनपर चरित्राचे स्वरूप प्राप्त न होता ते खऱ्या अर्थाने आत्मचरित्र झाले आहे.

पहिल्या दोन-तीन प्रकरणात त्यांनी त्यांच्या बालपणाचे त्यांच्या मृदु बालस्वभावाचे (फुलझाडांवर प्रेम करणाऱ्या स्वभावाचे) वर्णन एखाद्या कवीच्या रसाळ शैलीत केले आहे. आईच्या मृत्युपासूनच पहिले प्रकरण सुरू होते. तीन वर्षांचे असतानाच आईचा मृत्यु ओढवल्यामुळे नऊ वर्षांच्या बहिणीवरच त्यांची जबाबदारी पडली. प्राचार्यांच्या भाषेला कुठेंही बोजड, किचकट भाषाशैलीचा स्पर्श झालेला नाही. उलट आजोबा, आपल्या गत आयुष्यातील एखादी घटना-प्रसंग ज्याप्रमाणे समरसतेने नि रसाळपणे, आपल्याभोवती जमलेल्या नातवाना सांगतात, तशी प्राचार्यांची शैली आहे.

पुण्याच्या नू. म. वि. प्रशालेतून जेमतेम ' मॅट्रीक्युलेट ' झाल्या-नंतर शिक्षण सोडणे भाग पडले असताना तब्बल सहा वर्षांच्या ' शिक्षण विरामानंतरही मुंबई महापालिकेत पूर्ण वेळ नोकरी करीत–करीत, साधा मॅट्रीक्युलेट दीनानाथ एम्. ए. पीएच्. डी. होऊन प्राचार्यपदाप्रत पोहोचतो, ही गोष्ट खरोखर साऱ्या विद्यार्थ्यांना आदर्श ठरावी अशी आहे.

बेलापूर महाराष्ट्र शुगर मिल्समध्ये ' काटामास्तरची ' नोकरी करताना त्याना भेटलेला रुमपार्टनर ' देव '. गौड ब्राह्मण नियतकालिक संपादन करताना योगायोगाने भेटलेले इतिहास संशोधक, लेखक श्री. गं. फ. आजगावकर, प्राचार्यांचे थोरले काका ' ताता ' यांच्या-सारखी चांगली माया लावणारी माणसे जशी प्राचार्यांना भेटली, तशीच त्यांचे मेहुणे, प्राचार्यपदासाठी नाना क्लृप्त्या करणारे डॉ. अडतिया इ. सारखी त्यांच्या प्रगतीला बांध ठरणारी माणसेही त्याना पावलोपावली भेटली. पण प्राचार्यांचे वैशिष्टय आहे, की त्याना कोणाविषयीही काहीच गाऱ्हाणे नाही.

' रवळनाथाच्याच कृपेने सारे काही झाले, होत आहे ' या त्यांच्या म्हणण्यात त्यांच्या श्रद्धाळू नि जगाकडे चांगुलपणाने पाहायचा थोरपणा दिसून येतो.

## केसरी, ७ मार्च १९७६

सासवडच्या वाघिरे कॉलेजचे प्राचार्य श्री. दि. ग. नाईक यांचे ' माझी वाटचाल ' हे १५० पृष्ठांचे छोटें आत्मचरित्र. सुबोध आणि प्रेरक. श्री. नाईक यांनी आपल्या शैक्षणिक जीवनाची खडतर वाटचाल अतिशय प्रांजळपणे निवेदिली असून तीत कोकणच्या भूमीचे संस्कार-दर्शनहि त्यांनी ठळकपणे घडविले आहे. आप्तस्वकीय स्त्री–पुरुषांची या वाटचालीतील काही हृद्य शब्दचित्रे वाचकास भुलवतील अशी आहेत.

## गौड ब्राह्मण, नोव्हेंबर १९७५

' गौड ब्राह्मण त्रैमासिकाचे प्रकाशन प्रदीर्घ काळानंतर १९६१ च्या मकरसंक्रांतीस जोमाने सुरू करणाऱ्या डॉ. दि. ग. नाईक यांचा

परिचय नव्याने करून देण्याची आवश्यकता नाही. ६० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने डॉ. दि. ग. नाईक यांनी हे आत्मचरित्र प्रकाशित केले आहे.

स्वत: काहीच केले नाही. रवळनाथाच्या कृपेने आजवरची वाटचाल झाली असे आवर्जून सांगणाऱ्या डॉ. नाईक यांचे हे आत्मचरित्र एकदा वाचावयास घेतले की पूर्ण झाल्याशिवाय वाचक थांबणार नाही. हेच या आत्मचरित्राच्या यशाचे गमक आहे.

या ' वाटचाली 'त स्वातंत्र्यासाठी त्याग, कारावास, भाषणांची आतषबाजी आढळणार नाही. ' हार ' असेल पण सत्कारसमारंभ नाहीत. तरीहि हे आत्मचरित्र वाचकाला आकृष्ट करते, मार्गदर्शन करते. एका सामान्य माणसाची ही ' वाटचाल ' आहे. मुखपृष्ठावरील चित्रातील ' वाट ' ही सिमेंट कॉंक्रीटची असली तरी ती साठ वर्षानंतरची. मूळची पाऊलवाट मळलेली देखील नव्हती, काटयाकुटयातील होती. ते काटे सुरुवातीस बोचले. त्याची बोच आत्मचरित्रात जाणवली आहे. आयुष्यात यशापेक्षा अपयशाचे धनी वारंवार व्हावे लागले, परंतु त्या अपयशावर प्रयत्नपूर्वक मात केल्यामुळेच डॉ. नाईक यांना आजचे लौकिक यश मिळविता आले.

प्राचार्य नाईक यांनी पूर्वायुष्यात बेलापूरच्या साखरकारखान्यात काटामास्तर म्हणून काम केले होते यावर चरित्र वाचल्याशिवाय विश्वास बसणार नाही.

१९३९ साली मुंबई नगरपालिकेत वॉर्ड निरीक्षकाची नोकरी लागल्यानंतर जर नाईक यांनी सकाळ संध्याकाळ नोकरी करून विश्वविद्यालयीन शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला नसता तर मुंबई महापालिकेच्या एखाद्या विभागाचे प्रमुख म्हणून ते निवृत्त झाले असते. इंग्रजी विषय घेऊन ते बी. ए. व एम्. ए. झाले. ' आत्मचरित्राची कला ' या विषयावर त्यांनी डॉक्टरेट मिळविली.

' गौड ब्राह्मण 'ची संपादकीय वाटचाल घ्या किंवा विश्वविद्यालयीन प्राध्यापकाची वाटचाल घ्या, डॉ. नाईक यांचे आत्मचरित्र वाचत असता वाचकाला आत्मप्रत्ययाची अनुभूती झाल्यावाचून रहात

नाही आणि या अनुभूतीमुळेच वाचक डॉ. नाईक यांच्या आत्मचरित्राशी समरस होतो. मुंबई विद्यापीठातील अन्याय हे परंपरागत असले तरी या अन्यायाला जाहीर वाचा फोडण्याचा श्रीगणेशा प्रा. नाईक यांनी केला. मुंबई विद्यापीठाच्या कारभारासंबंधी चौकशी समिती नेमली तर या समितीला डॉ. नाईक यांच्या आत्मचरित्राची दखल घ्यावी लागेल.

डॉ. नाईक शतायु होवोत व त्यांच्या हातून अधिक लेखन प्रकाशित होवो, ही सदिच्छा.

## कोकण वैभव, नोव्हेंबर १९७५

बहुविधतेत जगाच्या पाठीवर कोकणच अग्रेसर ठरावे असे कुणी म्हटले तर अतिशयोक्ति ठरणार नाही. या पार्श्वभूमीवर 'माझी वाटचाल' हे प्राचार्य दिनानाथ गजानन नाईक यांनी लिहिलेले आत्मकथन वाचले म्हणजे या भूमीची महती पटते. डोळयात कृतकृत्ततेचे अश्रु तरळतात.

डॉ. नाईक हे कोकण भूमीपुत्र. त्यांनी आपल्या कर्तृत्वावर पीएच्. डी. पर्यंत शिक्षण घेऊन एक उच्चांक तोडला आहे. खानोलीच्या सिद्धेश्वर रवळनाथाच्या प्रेरणेने आपण सर्वकाही केले असा त्यांचा मनोविश्वास या आत्मकथनात स्पष्ट डोकावतो. अर्थात माणूस मोठा होतो तो श्रद्धेवर ! नि श्रद्धा ही काटेरी जीवनावरची हिरवळ समजली गेली पाहिजे, यासाठी हे चरित्र वाचनीय झाले आहे.

वयाची साठी उलटून गेलेले डॉ. नाईक हे तरूण नि कल्पक असावेत असे वाटते. कारण लेखणी जितक्या प्रक्षोभानें पेटते तितकी ती मऊशार गालीच्यासारखी हृदय हेलावून सोडणारी आहे. अनेक प्रसंग डोळयात पाणी आणतात. डॉक्टरांच्या जीवनाचा आदर्श घ्या. असे त्यांचे चरित्र सांगते. कोकणवरच केंद्रिभूत राहण्याचा त्यांचा मानस नाही तर भारतीय संस्कृती नि कोकणी माणसाची प्रवृत्ती यांचा हृदयंगम समन्वय आपण साधला पाहिजे.

त्यांच्या साठ वर्षांच्या जीवनात खूप सुख दुःखाचे प्रसंग आले पण त्यातील मार्मिक प्रसंगानी ही वाटचाल शब्दबद्ध झाली आहे.

डॉ. दि. ग. नाईक यांचे कार्य चालू आहेच. वयाप्रमाणे नि अनुभवाप्रमाणे त्यांची जबाबदारी वाढतच राहणार आहे. पण डॉक्टरांनी वाङ्मयात आणखी खूप भर घालावी अशी त्यांच्या चाहत्यांची इच्छा असल्यास नवल नाही. आम्ही या कोकणच्या भूमीपुत्राला त्याच्या कार्यात नि उज्ज्वल यशासाठी शुभ चिंतीतो.

**दर्यावर्दी, जानेवारी १९७६.**

प्राचार्य नाईक यांचे हे आत्मचरित्र अतिशय रंजक आणि बोधप्रद आहे. सर्व तऱ्हेच्या वाचकाना ते निरनिराळ्या कारणांमुळे आवडेल.

त्यांच्या कोकणातील बालपणाच्या आठवणी कुणाला आवडतील. त्याना बालपणी भेटलेली वेगवेगळी माणसे कुणाला आठवत रहातील. त्या काळातले छोटे छोटे प्रसंग विद्यार्थ्यांनाही आवडतील. त्यांनी शिक्षणासाठी किती कष्ट केले, किती अपमान सोसले, शेवटपर्यंत जिद्द ठेवून ते एम्. ए. पीएच्. डी. झाले ते वाचून कौतुक वाटल्याखेरीज रहात नाही.

साखरकारखान्यात नोकरी केली. तेथील तारूण्यसुलभ मोह टाळले. महापालिकेत सहा सात वर्षे नोकरी केली. नोकरी करता करता इंग्रजी विषय घेऊन बी. ए., एम्. ए. परीक्षा चांगल्या तऱ्हेने उत्तीर्ण झाले.

रूइया, खालसा अंधेरीचे एम्. व्ही आणि दयानंद या कॉलेजात त्यांना प्राध्यापक म्हणून नोकरी केली. सगळ्या ठिकाणी त्यांची काही चुकी नसताना इतरांच्या सत्तालोभाने, भ्रष्टाकारांमुळे त्यांना नेहमी नोकरी सोडावी लागली. प्रा. नाईकांची बाजू न्याय्य असताही दयानंद कॉलेजविरूद्ध मुंबई विद्यापीठ काही करू शकले नाही. आपल्या शैक्षणिक संस्थामधील भ्रष्टाचार इतका बोलका दुसऱ्या आत्मचरित्रात झालेला नाही.

प्रा. नाईकानी नडियाद येथे असताना एकट्याने दोन तीन गुंडाशी धीराने कसा सामना दिला ती गोष्ट वीरपुरुषांच्या चरित्रात शोभणारी आहे. दारिद्र्य, भ्रष्टाचार, वशिलेबाजी यांच्याशी झगडणाऱ्या ह्या

लेखकाच्या मनात कुठेही कडवटपणा नाही आणि तो स्वत:बद्दल कुठेही प्रशंसेने बोलत नाही.

आपल्या कुलदैवतावर (भोडक्या रवळनाथवर) त्यांची असलेली श्रद्धा ठायी ठायी व्यक्त होते ती मनोज्ञ आहे.

आपले नातेवाईक, आका भाविण, तिचा सरदार नवरा, वर्गमित्र निस्सीम इझीकेल, वेगवेगळे प्राचार्य, गौडब्राह्मण सभेचे नेते इ. ची व्यक्तिचित्रे परिणामकारक उतरली आहेत.

शिक्षकीपेशाच्या व्यक्तीचे आत्मचरित्र म्हणजे ते कंटाळवाणे असते. हा समज येथे खोटा ठरतो. चांगल्या कादंबरीप्रमाणे रसाळ असे हे आत्मचरित्र आहे. कोणत्याही वयाच्या व थराच्या वाचकाना निश्चित आवडेल असेच हे पुस्तक आहे. मराठी चरित्रवाङ्मयात एका गुणी व कर्तबगार माणसाच्या ह्या प्रांजळ आत्मचरित्राने महत्त्वाची भर घातली आहे.

## वसंत, मार्च १९७६

डॉ. नाईकानी प्रस्तुत आत्मचरित्राच्या रूपाने मराठीत एका चांगल्या पुस्तकाची भर घातली आहे यात शंका नाही. मुंबई, नडियाद सासवड अशा निरनिराळ्या ठिकाणी प्राध्यापकी करीत असताना त्याना ज्या प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागले, ज्या ज्या हितचिंतकानी त्यांना तशा परिस्थितीत सक्रीय सहानुभूती दाखवून उपकृत केले, तो सर्व इतिहास प्रा. नाईकांनी मनमोकळेपणाने निवेदन केला आहे. तसेच त्यांच्या मार्गात काटे पेरून ठेवणाऱ्या हितशत्रूंच्या कुटिल कारस्थानांचाही त्यांनी निर्देश केला आहे. पण तो करीत असताना त्यांनी कोठेही संयम सोडला नाही.

प्राध्यापकीचा पेशा पत्करण्यापूर्वी, उदरनिर्वाहाच्या निमित्ताने इतर लहान सहान नोकऱ्या करीत असताना त्यांना जे विविध प्रकारचे भलेबुरे अनुभव आले त्यांचीहि त्यानी खिलाडूपणाने नोंद केली आहे. श्री. गुं. फ. आजगांवकरांसारखे त्यांना जे प्रेमळ, उदारकमनस्क वृत्तीचे मित्र लाभले त्यांच्या उपकारी वृत्तींचा व सौहार्दाचा उल्लेख करताना तर त्यांचे अंत:करण कृतज्ञतेच्या भावनेने तुडुंब भरून आलेले दिसून येते.

आत्मगौरवाच्या हेतूने स्वतःची चरित्रे लिहिताना बोरूबहाद्दरांची 'इये मराठियेचे नगरी' कमतरता नाही. सूर्यचंद्राचे उदयास्त, समुद्राची भरती ओहोटी– या सर्वांना आपणच कारण आहोत अशा अभिनिवेशाने ही मंडळी आत्मचरित्र लिहायला सरसावलेली असतात. पण प्रस्तुत आत्मचरित्र 'त्यातले' नव्हे, हे मुद्दाम सांगणे आवश्यक आहे.

**आयुध, जुलै–ऑगस्ट १९७६.**

सासवड येथील वाघिरे महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. दिनानाथ गजानन नाईक यांनी लिहिलेले हे एक छोटेखानी पण मनोवेधक असे आत्मचरित्र आहे.

डॉ. नाईक यांनी 'आत्मचरित्राची कला' हा प्रबंध लिहून मुंबई विश्वविद्यालयाकडून 'डॉक्टरेट' मिळविली असल्यामुळे त्यांचे आत्मचरित्र नमुनेदार असणार अशी अपेक्षा करणाऱ्या वाचकालाही हे आत्मचरित्र वाचून 'अपेक्षे' पलिकडे आनंद मिळाल्यावाचून राहाणार नाही.

प्रस्तुत आत्मचरित्राची भाषा अत्यंत प्रासादिक असून लेखकाने तिच्याद्वारे रेखाटलेली 'आवेऱ्याचे गजबजलेले माळीचे घर', 'ठेंगणी–ठुसकी आका भावीण', तिच्याबरोबर वारंवार लेखकाच्या घरी येणारा 'दुकानदार', 'भोगलोलुप दादा', लेखकाच्या पत्नी सौ. गुलाब, नडियादचा दरोडा इत्यादी शब्दचित्रे विलक्षण मनोवेधक झाली आहेत.

प्रथमपासून प्रतिकूल परिस्थितीशी झगडत झगडत लेखकाने अत्यंत जिद्दीने आपल्या जीवनाची वाटचाल कशी केली हे नुसते पाहण्यासारखेच नव्हे तर कित्ता घेण्यासारखे आहे.

साखर कारखान्यातील काटा मास्तराच्या नोकरीपासून सासवड येथील वाघिरे महाविद्यालयाच्या प्राचार्य पदापर्यंत पोचताना लेखकावर आलेल्या एकेका प्रसंगाचे त्याने केलेले वर्णन इतके बहारदार उतरले आहे की वाचक अगदी मंत्रमुग्ध व्हावा.

मुंबई नगरपालिकेतील वॉर्ड इन्स्पेक्टरची नोकरी करता करता अपार कष्ट करून घेतलेले महाविद्यालयीन शिक्षण निरनिराळ्या

संस्थात काम करताना दाखविलेली युयुत्सुवृत्ती स्वाभिमान व बाणेदारपणा तसेच सबंध आयुष्यभर झुळझुळ वाहणारा ' मोडक्या ' वरील नितांत श्रद्धेचा झरा इत्यादींच्या दर्शनाने चरित्रनायकाच्या असामान्य व्यक्तित्त्वाचा ठसा वाचकाच्या मन:पटलावर ठसठसीतपणे उमटतो आणि यातच या ' वाटचाली 'चे सारे यश सामावले आहे असे म्हणावेसे वाटते.

२०८, मधुबन<br>
स्वामी विवेकानंद रोड<br>
गोरेगाव, पश्चिम, मुंबई नं. ६२<br>
५-२-१९७६

स. न. वि. वि.

कुडाळदेशकर समाजात खळबळ उडवून देणारे ' माझी वाटचाल ' हे पुस्तक मुद्दाम विकत घेऊन वाचले. हे पुस्तक म्हणजे, माझ्या दृष्टीने आत्मचरित्र पद्धतीच्या लिखाणात उत्कृष्ट दर्जाचे आहे. आपली भाषाशैली सोपी, सरळ व खुलून दिसते. आपण मराठी भाषेला व आमच्या घराण्याला ललामभूत ठरेल असे उत्कृष्ट लिखाण लिहिले आहे. याबद्दल अतिशय अभिमान वाटतो.

परमेश्वर आपल्याला दीर्घायुरोग्य देऊन अशीच साहित्य-सेवा घडवो अशी त्यांचेकडे प्रार्थना.

—प्रभाकर अनंत नाईक

वन्दे मातरम् ।

डॉ. मो. दि. पराडकर<br>
४/११ शहा बिल्डींग, भगत गल्ली,<br>
माहीम, मुंबई ४०० ०१६.<br>
१६-८-७७

सप्रेम नमस्कार वि. वि.

श्री. दादासाहेब टिकेकर यांना तुम्ही दिलेले ' माझी वाटचाल ' हे पुस्तक मुद्दाम त्यांच्याकडून घेऊन उत्सुकतेने अथपासून इतिपर्यंत

वाचले. जीवनात व शिक्षणक्षेत्रात तुम्ही जो सतत संघर्ष केला त्याची यथार्थ जाणीव झाली. 'दैवाचे खेळ' हे प्रकरण वाचीत असताना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळाला. कारण त्यासारख्या अनुभवांतून मलाही जावे लागले व शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा, त्यातील लांड्या-लबाड्यांचा व तोंडपुजेपणाला दाद देणाऱ्या संचालकांचा ही थोडाफार अनुभव आला. त्याचे चटके तूर्त अनुभवीत आहे. तुम्ही रवळनाथावरील श्रद्धेने सर्व संघर्षाला तोंड दिले. त्याचप्रमाणे भैरवनाथावरील श्रद्धेच्या व त्याच्याच कृपेने क्वचित आढळून येणाऱ्या माणुसकीच्या जोरावर 'संधिकालातील सूर्योदयाची वाट पहात आहे-असी ' माझी वाटचाल'च्या रूपात एक वाचनीय व उद्बोधक आत्मचरित्र सादर केल्याबद्दल एक समव्यावसायिक या नात्याने हार्दिक अभिनंदन व यापुढील तुमचे आयुष्य सुखासमाधानाचे जावो ही हार्दिक इच्छा.

कळावे लोभ असावा ही विनंती.

–मो. दि. पराडकर.

**वा. रा. ढवळे**

१२६/डी फणसवाडी.
जगन्नाथाची चाळ, मुंबई ४०० ००२.

Dear Dr. Naik,

I was thrilled to go through your life–story viz. 'माझी वाटचाल.' I read the book almost at a stretch. I was amused to observe that the supernatural element– I may call it God's grace– has pervaded the entire narration of your life–story. The narration betrays the religious mould of your nature. It may, perhaps be due to the circumstances in which you had to spend the days of your childhood without the affectionate touch of your mother who had unfortunately died at a very premature age leaving you almost to the winds !

It is really very creditable that you carved out your own prospects inspite of adverse circumstances. It speaks volumes about your tenacity and determination with which you completed your academic education. Undaunted in spirit, you boldly faced the worries of a chequered life and ultimately achieved your goal

Your माझी वाटचाल depicts all details and lists all events with utmost clarity and no doubt makes smooth reading.

माझी वाटचाल is full of incidents and personalities of your time. You could have drawn beautiful pen-pictures of them all a little more elaborately and could have made the book more pleasant reading. I admit, even in its present form, it is worth reading, since it is both instructive and inspiring.

You are bold enough to pass some significant remarks against some persons who are notorious in academic field. I am afraid the remarks are likely to be challenged in a Court of Law. Of course the persons are so shameless and so securely saddled in their seats that they may not resort to court action for fear of being exposed further.

The end of your autobiography is rather abrupt. The use of Kudalee dialect af Marathi no doubt has added colour tc the narration. From your माझी वाटचाल. I have discovered that your wife has wonderfully cooperated with you in your march of life and whenever you ignored her advice you came to trouble and grief.

Yours sincerely,
**V. R. DHAVALE**

# ' अनंत शिवाजी ' ग्रंथावरील दोन अभिप्राय

## मुंबई सकाळ, ता. २३-१०-१९८५

आज टोपी जवळ जवळ इतिहासजमा झालेली असली तरी एकवेळ टोपीवाले असे बिरूद सार्थपणे मिरवून फार मोठी प्रतिष्ठा ज्यानी मिळविली त्या रावबहाद्दूर अनंत शिवाजी देसाई टोपीवाले यांची ओळख आजच्या पिढीला फारशी असण्याची शक्यता नाही. परंतु

त्यांचे चरित्र आजही उद्बोधक ठरावे. अशा अनंत शिवाजी देसाई यांचे चरित्र प्रसिध्द करून लेखक डॉ. दि. ग. नाईक व प्रकाशक कोकण मराठी डायलेक्टस् रिसर्च इन्स्टिटयूट यांनी एक समाजोपयोगी कार्य केले आहे. रा. ब. देसाई यांच्या १२५ व्या जयंतीच्या वर्षात ' अनंत शिवजी ' हे छोटेखानी चरित्र प्रसिद्ध करण्यात तर विशेष औचित्य साधले गेले आहे. अत्यंत निर्धन अवस्थेत असताना व पदरी शिक्षणाची पुंजी मुळीच नसताना गेल्या शतकात जन्मलेल्या रावबहाद्दूर देसाई यांनी धंद्यात जे अपूर्व यश मिळविले ते अनेकाना आजही स्फूर्तिदायक ठरेल. धंदा-उद्योगाचे क्षेत्र आता केवढे तरी वाढले आहे. पण त्यात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेले दीर्घोद्योग, चिकाटी इत्यादी गुण जे अनंत शिवाजी यांच्या जीवनात आढळतात, ते आजही मार्गदर्शक ठरणारे आहेत. अनंत शिवाजी यांनी अमाप यश मिळवून भरपूर संपत्ती कमावली. पण आपण समाजाचे काही ऋण लागतो याची जाण सतत कायम ठेवून आपले जीवन सार्थकी लावणाऱ्या थोड्या लोकात त्यांची गणना केली पाहिजे. प्रस्तुत ' अनंत शिवाजी ' या पुस्तकात या साऱ्या गोष्टी रोजकपणे मांडल्या आहेत. पण ज्या ज्ञातीत या थोर पुरूषाचा जन्म झाला त्या ज्ञातीच्या प्राचीन इतिहासाचे दिग्दर्शन केले असल्याने ग्रथाचे मोल वाढले आहे. योग्य वेळी ग्रंथ प्रसिध्द करून डॅा. नाईक यांनी एक समाजकार्य साधले आहे. सर्वानाच उद्बोधक वाटेल असा हा ग्रंथ आहे. लहान असला तरी मोलाचा आहे. लेखक म्हणूनच धन्यवादास पात्र आहेत.

**कोकण-वैभव, २६ नोव्हेंबर १९७८.**

श्रीमद् दत्तगिरी चरित्र, राईज अॅण्ड डिक्लाईन ऑफ दशावतार, सेनापती भोसले, कोकण रेल्वे प्रवर्तक, माझी वाटचाल, यासारख्या कोकणच्या विविधांगाचे दर्शन घडविणारी अनेक पुस्तके प्रकाशित करून मराठी साहित्यात मोलाची भर घालणाऱ्या कोकण मराठी डायलेक्टस् रीसर्च इन्स्टिटयूट या संस्थेने प्राचार्य दिनानाथ गजानन नाईक यांनी लिहिलेले ' अनंत शिवाजी ' नावाचे पुस्तक नुकतेच प्रकाशित केले आहे.

रावबहादूर श्रीमंत अनंत शिवाजी तथा भाऊसाहेब देसाई यांच्या सव्वा जन्मशताब्दी निमित्त हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले असून यात त्यांच्या जीवनकार्याचा सखोलतेने आढावा घेतल्याचे आढळून येते.

कोकणच्या भूमीत जी जी कर्तृत्वसंपन्न मंडळी झाली त्या मंडळीच्या नामावळीत प्रामुख्याने भाऊसाहेबांचा अग्रक्रम लागतो. कुडाळ महालातील वालावली येथे गरीब कुटुंबात जन्मलेल्या भाऊसाहेबांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर शून्यातून विश्वनिर्मिती केली. सामान्यातून असामान्यत्वाकडे झेप घेतली आणि बघता बघता मुंबईतील नामवंत उद्योगपतींच्या प्रभावळीत अग्रमान मिळविला.

मुंबईच्या औद्योगिक जडणघडणीत सिंहाचा वाटा उचलून मुंबापुरीचे नागरी जीवन उंचविण्यासाठी अखंड परिश्रम केले. तसेच आपल्या ज्ञातिबांधवांसाठी, कोकणच्या मायभूमीसाठी त्यांनी तनमनधन अर्पून कोकणचा विकास करण्याच्या कामी महत्त्वाची कामगिरी बजावली. विविध क्षेत्रातील संस्थाना देणग्या व मदती देऊन त्यांना संपन्नता प्राप्त करून देण्यात त्यांनी घेतलेला पुढाकार आणि गौड ब्राह्मण समाजाच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी केलेले परिश्रम हे अतुलनीय असे असून भाऊसाहेबांच्या कर्तृत्वाचे विविध पैलूचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न डॉ. नाईकानी केला आहे.

हा प्रयत्न करीत असताना त्यांनी तत्कालिन परिस्थिती कुडाळदेशकर समाज, कोकणची अवस्था आदिंची विस्तृत माहिती दिली असून यात देसाई कुटुंबियांचे स्थान काय होते याचा अत्यंत मार्मिकतेने ऊहापोह केला आहे.

अनंत शिवाजीचे अनंतपण प्रगटीत असताना अनंताच्या घरच्या बऱ्यावाईट परिस्थितीचे अनंताच्या जिद्दी स्वभावाचे, करारीपणाचे आणि त्यानी दिलेल्या कठोर सामन्याचे समालोचन श्री. नाईकांनी सडेतोडपणे मांडले असून या चरित्राची अधिक खुलावट खुलविली आहे.

या चरित्रग्रंथास पोषक अशी प्रस्तावना सुप्रसिद्ध साहित्यिक आणि कवी श्री. गुं. फ. आजगावकर यांनी लिहिली असून अत्यंत परिश्रमपूर्वक संपादन आणि प्रकाशन केले आहे.

या चरित्रग्रंथात श्रीमंत नारायणराव देसाई टोपीवाले, श्रीदेव नारायण क्षेत्र वालावल, श्रीमद् आद्य शंकराचार्यान्वित श्रीमद् परमहंस परिव्राजकाचार्य, श्रीमद् रामानंदस्वामी महाराज, श्रीमठ दापोली संस्थान, श्रीदेव आदि नारायण परुळे, श्रीदेव रवळनाथ, कुणकेश्वरचे प्राचीन शिवालय, श्रीक्षेत्र वालावल, नर्मदाबाई वसतिगृह, नर्मदाबाई अनंत देसाई टोपीवाले, टोपीवाला वाचनालय, टोपीवाला मॅन्शन यासारखी सुबक आणि आकर्षक अशी अनेक छायाचित्रे यात जागोजागी असून सुप्रसिध्द चित्रकार श्री. य. शं. सामंत यानी भाऊसाहेबांचे मुखपृष्ठावर काढलेले चित्र अत्यंत आकर्षक आहे.

या पुस्तकात डॉ. दि. ग. नाईकानी अनंत शिवाजीच्या विषयीची माहिती देत असताना भाऊसाहेबांची वंशावळ, भाऊसाहेबांची कुंडली, बाळकृष्ण पाटलांची 'हे रत्नकाला' ही कविता, नागदेवाचा ताम्रपट, गाऱ्हाणे, निरनिराळी रेखाचित्रे जगन्नाथ रघुनाथांचे पत्र यासारखी विविध प्रकारची माहिती प्रामुख्याने दिली असून वाचकाना ती निश्चित आवडेल.

रावबहाद्दूर अनंत शिवाजी देसाई यांच्या जीवनकार्याचे हे पुस्तक महाराष्ट्र शासन विविध जिल्हा परिषदा, नगरपालिका आणि मुंबई महापालिकेने जास्तीत जास्त प्रमाणात घेऊन त्यांच्या कार्याचा सर्वत्र प्रसार करून त्यांची सव्वा जन्मशताब्दी साजरी करावी.

● ●



प्राचार्य डॉ. दि. ग. नाईक